
# श्री साईलीला



ऑक्टोबर १९६७ : दसरा विशेषांक

किंमत ५० पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर,** टे. नं.
जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ ३५५७३१



# श्री साई वाक्सुधा

बाबा कधीं कधीं मौन धारण करीत असत. त्या त्यांच्या मौनांतही गूढ अर्थ भरलेला असे. भक्तांना तो समजायचा व त्यापासून ते जरूर तो बोध घेत असत. भक्त गरीब असो वा श्रीमंत असो. बाबांची सर्वांकडे पहाण्याची समदृष्टि असे. प्रत्येकाशीं सूचक बोलून ते मार्ग मोकळा करीत असत. भक्तांचें कल्याण साधावयाचें हीच त्यांची एकमेव दृष्टि असे. ते प्रेमाचा केवळ सागरच होते. तो सागर कधीं आटला नाहीं. सर्वांभूतीं समभाव व सर्वांचें कल्याण साधणें यासाठीं ते झटत असत. कधीं विनोद, कधीं रागावणें, कातावणें तर कधीं थट्टा-मस्करी करणें हे विविध प्रकार सतत चालू असत.

—श्रीसाईसच्चरित्


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] ऑक्टोबर १९६७ [ अंक १९ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४२३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

विजया दशमी हा श्रीसाई बाबांच्या निर्याणाचा अर्थात पुण्यतिथीचा महन्मंगल दिवस. १९१८ साली विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर बाबा समाधिस्थ झाले. त्या घटनेस पुढील वर्षी म्हणजे १९६८ साली पन्नासावें वर्ष लागत आहे आणि त्यानिमित्त पुढील वर्षी बाबांची सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी मोठ्या थाटामाटांत साजरी केली जाणार आहे.

प्रतिवर्षी विजया दशमीस बाबांच्या पुण्यतिथीचा सोहळा सतत तीन दिवस समारोहानें साजरा केला जात असतो. तसा तो या वर्षी पुढील आठवड्यांत नित्य नेमाप्रमाणें साजरा केला जाईलच. परंतु पुढील वर्ष हें बाबांच्या निर्याणाचें सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्यामुळें त्याला आगळें महत्त्व प्राप्त व्हावें हें सहाजिकच आहे.

हा सुवर्णमहोत्सव, विजयादशमीच्या सप्ताहांत बाबांच्या थोरवीला व त्यांच्या चिरस्मरणीय नि लोकोपकारी कामगिरीला साजेसा भव्य प्रमाणांत व्हावा यासाठी समिती नेमण्यांत आली असून त्यांत जनतेच्या नि सरकारच्या दृष्टीनें फार मोठीं व जबाबदार माणसें आहेत.

हा महोत्सव सतत सात दिवस शिर्डी येथें साजरा व्हावयाचा असून त्याची तयारी एव्हांपासून सुरू झालेली आहे.

शिर्डीत प्रतिवर्षी तीन महोत्सव विशेष भव्य प्रमाणांत साजरे केले जातात. श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा नि विजयादशमी (पुण्यतिथी उत्सव) ह्या तिन्हीं उत्सवास भक्तगण फार मोठ्या संख्येनें हजर रहात असतो.

हे तिन्हीं उत्सव प्रत्येकीं तीन दिवस चालू असतात. शिर्डीत येणाऱ्या भक्तांची सर्व प्रकारची व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी शिर्डी—संस्थान चालकांवर असते. ही जबाबदारी विविध स्वरूपाची असते. भक्तांच्या रहाण्यासवरण्याची, स्नानाची, भोजनाची, खाण्यापिण्याची, आरोग्य रक्षणाची वगैरे सोय समाधानकारक रीतीनें लागावी यासाठीं जास्तींत जास्त मेहनत घ्यावी लागत असते.

ह्या प्रतिवार्षिक उत्सवावरून पुढील वर्षी एक सप्ताहभर होणाऱ्या बाबांच्या सुवर्ण महोत्सवी उत्सवाचे स्वरुप किती भव्य असेल व त्यासाठीं संस्थान चालकांना पूर्व तयारीसाठीं किती झटावें लागणार आहे याची सहज कल्पना करतां येण्या सारखी आहे.

साईबाबांची पुढील वर्षी येणारी पन्नासावी पुण्यतिथी ! ही एकूणपन्नास पन्नास वर्षे कशी हां हां म्हणतां निघून गेली. ह्या कालखंडाचा ह्या दृष्टीनें प्रत्येक भक्तानें विचार करण्यासारखा आहे. पन्नास वर्षांपूर्वीच्या बाबा शिर्डीत देहानें वावरत होते. भक्तांच्या सुखदुःखाची चिंता वहात त्यांना दिलासा देत होते.

आणि आज ? एकूणपन्नास किंवा पन्नास वर्षांचा काळ लोटला तरी भक्त-दृष्टीनें त्यांचे जें महत्तम कार्य होते तें आजही त्याच जोमानें चालू आहे.

बाबांनीं आपल्या ह्यातींत भक्तांना सांगून ठेविलें होतें कीं, मी जरी दूर गेलों, दृष्टिआड झालों तरी माझे भक्त हेंच माझें सर्वस्व मुळें मी त्यांच्यापासून कधींही दूर जाणार नाहीं. त्यांच्या हृदयांत निरंतर स्थान राहील. ज्या ज्या वेळीं श्रद्धायुक्त अंतःकरणानें माझे भक्त मला आरतील त्या त्या वेळीं मी त्यांच्या हांकेसरसा त्यांच्या पुढ्यांत येऊन उभा राहीन जें कांहीं दुःख असेल तें मी नाहींसें करीन, याबद्दल त्यांनीं पक्की खात्री दी.

बाबांनीं पन्नास वर्षांपूर्वीं आपल्या भक्तांना दिलेले आश्वसन याप्रसंगीं कोणाला णार नाहीं ?

“शिरडीस ज्यांचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ॥
माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हें हरेल सर्व त्याचें ॥
जरी हें शरीर गेलों मी टाकून । तरी मी धांवेन भक्तांसाठीं ॥
नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धि माझ्या ठायीं ॥
नित्य मी जिवंत जाणा हेंचि सत्य । नित्य घ्या प्रचीत अनुभवें ॥
शरण मज आला आणि वायां गेला । दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥
जो जो मज भजे जैशा जैशा भावें । तैसा तैसा पावें मीही त्यासी ॥
तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हें अन्यथा वचन माझें ॥
जाणा येथें आहे सहाय्य सर्वांस । मागें जें जें त्यास तें तें लाभे ॥
माझा जो झाला काया वाचा मनें । तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥

बाबांनी आपल्या भक्तांना उद्देशून आपल्या ह्यातींत हें जें आश्वासन दिलें पालन आजवर त्यांनी केलें आहे व पुढील काळातही तें भक्तांच्या अनुभवास शिवाय रहाणार नाहीं.

गेल्या पन्नास वर्षांच्या काळांत हजारो नव्हे लक्षावधि भक्तांनी या आश्वासनाचा घेतला आहे व आजही घेत आहेत.

पन्नास वर्षें, अर्धे शतक हा कालावधि थोडाथोडका म्हणतां येणार नाहीं. कालावधींत या देशांत व साऱ्या जगतांत कितीतरी घडामोडी नि उलथाप झाल्या. क्रांत्या झाल्या व जीवनमूल्यें बदललीं; परंतु शिर्डीत समाधिस्थ झालेल्या थोर सत्पुरुषानें भक्तांना जी आश्वासनें दिलीं तीं सर्व खरीं ठरलीं आहेत.

बाबांचा भक्तसमूह दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. सर्वच बा उत्तरोत्तर वाढ होत चालली आहे. आजकाल आपण ती पहात आहोत व अनुभ आहोंत.

आपण प्रत्यक्ष शिर्डी क्षेत्राचेंच उदाहरण घेऊंया. बाबांच्या काळची प वर्षांपूर्वीची शिर्डी नि आजची शिर्डी यांमध्यें केवढा थारेपालट घडून आलेला बरें ? बाबांच्या थोर पुण्याईमुळें शिर्डी संस्थानचा आज खरोखरच आश्चर्य कायापालट घडून आलेला आहे. भक्तजनांच्या सुखसोयीसाठीं नवनव्या इ वर्षानुवर्ष बांधल्या जात आहेत. मुलांच्या प्राथमिक नि दुय्यम शिक्षणाची प्रकारची सोय करण्यांत आली आहे. स्त्रीपुरुष नि मुलेबाळें ह्यांच्यासाठीं औ चाराची अद्यावत सोय करण्यांत आली आहे. स्त्रियांसाठीं सूतिकागृह व रोग्यां हॉस्पिटलची सोय टुमदार इमारती बांधून करण्यांत आली आहे. भक्तांच्या वि साठीं उद्याने वाढविण्यांत आलीं आहेत.

वर्षानुवर्ष भक्तांची संख्या वाढत चालली आहे. रोजच्या रोज बा दर्शनासाठीं नि अभिषेक पूजा–अर्चा वगैरे कार्यानिमित्त वाढत्या प्रमाणांत भ येऊं लागला आहे. अशी ही वाढ सतत चालली आहे, ती का उगाच ?

याचें कारण एकच. आजही बाबांचे अस्तित्व नि कर्तृत्व पूर्वीइतकेंच भ जाणवत आहे. त्यांत बदल यत्किंचीत्‌ही झालेला नाहीं.

श्री साईबाबा हे जागते व लोककल्याणासाठीं सदैव झटणारे दैवत आहे भक्तीभावानें नि श्रद्धायुक्त अंतःकरणानें दिलेल्या हांकेला ओ देतात; भक्ताचें मग तें कोणत्याही प्रकारचें असो, तें दूर करण्यासाठीं झटतात अशी भक्तांच खात्री झालेली आहे; आणि त्यामुळे ह्याच देशांत नव्हे तर देशाबाहेरहि दूर ठिकाणीं बाबांचे भक्त फार मोठ्या प्रमाणांत पसरलेले आहेत. ते परोपरीनें बा आठवण करतात व बाबाही त्यांच्या आठवणीचें फळ त्यांच्या पदरांत टाकल्या रहात नाहींत.

अशा रीतीनें गेल्या पन्नास वर्षांच्या कालखंडाकडे सहजासहजीं जरी फिरविली तरी वर्षानुवर्ष साईभक्तांचा सोहळा वृद्धिंगत होत चालल्याचें आ येईल.


'जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूति' साईबाबासारखे सत्पुरुष केवळ लोक-
णासाठीं या भुतलावर अवतीर्ण होतात. आपलें तें कार्य पार पाडतात व देहानें
गांतून दृष्टिआड झाल्यानंतरही त्या लोककल्याण कार्यांची ध्वजा सतत व अविरत
कवीत ठेवीत असतात.

बाबांच्या लोककल्याण कार्यांची ध्वजा गेलीं पन्नास वर्षे अखंड फडकत राहिली
तशीच ती पुढेंही फडकत राहील.

सत्पुरुषांच्या, संस्थांच्या किंवा थोरामोठ्यांच्या आयुष्यांत असा एक कालखंड
असतो कीं, त्यावेळीं मार्गे वळून पहाण्याची बुद्धि सहाजिकच होत असते. तो
पुढील वर्षी प्राप्त होत आहे. त्यावेळीं आमच्या या 'साईलीला' मासिका-
सांगायचें म्हणजे त्या विजयादशमीस एक सुंदर, भव्य नामवंत नि विचारवंत
कांच्या व भक्तांच्या लेखांनी सालंकृत असा एक खास अंक प्रसिद्ध करण्याचा
चा विचार आहे. या कार्यांत आम्हीं सर्वांकडून जास्तीत जास्त सहकाराची
क्षा करीत आहोंत.

त्याचबरोबर मासिक साईलीलेसंबंधी दुसरी एक महत्त्वाची गोष्ट जाहीर
याचा मोह यावेळीं आवरणें अशक्य झालें आहे. 'साईलीला' हें मासिक साई-
तांच्याच नव्हे तर सर्वसाधारण वाचकांच्याही दृष्टीनें जास्तींत जास्त वाचनीय
दर्शक नि उद्बोधक व्हावें, त्याची उपयुक्तता शक्य तेवढी वाढावी, या दृष्टीनें
चे प्रयत्न चालू आहेत. त्यांचें फळ एकदम नाहीं दिसून येणार; परंतु यापुढील
कांत त्याची प्रचीति येत जाईल.

हें कार्य एकट्यादुकट्याचें का आहे? त्यांत आम्हीं आपल्या सहकार्याची अपेक्षा
त आहोंत. सर्वांनीं मिळून हें कार्य पार पाडावयाचें आहे. आम्हांला आशा आहे
या पवित्र कार्यांत आम्हांला आमच्या वाचक बंधू-भगिनींचा व भक्तांचा संपूर्ण
कार मिळेल.



# भक्ताचा स्वभाव

अनुवादिका : कु. मंगला पेठे, फलटण

प्रल्हादानें गुरुजींच्या सांगण्यानुसार हरीनाम सोडलें नाहीं. तेव्हां त्यांनीं य येऊन अग्निशिखेप्रमाणें प्रज्वलित असलेली शरीरप्रकृति उत्पन्न केली. अत्यंत भयानक अशा राक्षसीनें पृथ्वी हादरविणाऱ्या पावलांचा आवाज करीत प्रगट होऊन मोठ्या रागानें प्रल्हादजींच्या छातीवर त्रिशूळानें प्रहार केला; परंतु बालकाच्या हृदयाला तो झगमगता त्रिशूळ लागताच त्याचे तुकडे तुकडे होऊन जमिनीवर पडला. ज्याच्या हृदयामध्यें भगवान् श्रीहरि निरंतर प्रकटरूपांत नि करतात, त्या हृदयाला वज्र लागतांच त्याचेसुद्धां तुकडे तुकडे होतात. मग त्रिशूळ तर गोष्टच वेगळी.

पापी पुरोहितांनीं त्या निष्पाप भक्तावर कृत्येचा प्रयोग केला होता. व करणाऱ्याचें नेहमीं वाईटच होतें. म्हणूनच त्या कृत्येनें त्या पुरोहितांना मारून त्या त्यांना मारून ती स्वतः पण नष्ट झाली. आपल्या गुरूंना त्या कृत्येच्या द्वारा ज जातांना पाहून महामति प्रल्हाद 'हे कृष्ण ! रक्षण कर. हे अनंत ! यांना वा असे म्हणत त्यांच्याकडे धावले.

प्रल्हादजी म्हणाले–'हे सर्वव्यापी, विश्वरूप, विश्वस्रष्टा जनार्दना ! ब्राह्मणांचे मंत्राग्निरूपी आणि भयानक अशा संकटापासून संरक्षण करा. जर मी सत्याला मानतों कीं जगद्गुरु भगवान् सर्व प्राण्यांमध्यें निवास करतात तर या प्रभावानें हे सर्व पुरोहित जिवंत होवोत. जर मी सर्वव्यापी आणि अक्षय अ भगवंताला माझ्या शत्रूमध्यें सुद्धां पाहतों तर हे सर्व पुरोहित जिवंत होवोत. जे म मारण्यासाठीं आले, ज्यांनीं मला विष दिलें, अग्निमध्यें जाळलें, मोठमोठ हत्यारांनीं जखमा केल्या आणि सर्पांकडून दंश करवला, त्या सर्वांबद्दल मा मनांत कधींही वाईट विचार आले नाहींत, तेव्हां या सत्याच्या प्रभावानें हे स पुरोहित जिवंत होवोत.'

असें म्हणून प्रल्हादानें त्यांना स्पर्श केला आणि त्याचा स्पर्श होतांच ते म पडलेले पुरोहित जिवंत होऊन उठून बसले व मुक्तकंठानें प्रल्हादचे गुण करूं लागले !

---

# साधकाची साधना

घरदार सोडून जंगलांत जाऊन राहिल्यानें मोक्षाचें द्वार मोकळें होऊं शकत नाहीं. आपल्या अंगावरील शुभ्र वस्त्रांचा त्याग करून भगवीं वस्त्रें धारण केल्यानेंही मोक्षाचा मार्ग मोकळा होऊं शकत नाहीं. तो त्याग होऊं शकत नाहीं. खरा त्याग कोणता ? आपल्याठायीं वास्तव्य करून राहिलेल्या अहंकाराचा त्याग संपूर्णपणें करतां आला पाहिजे. तोच खरा व मोक्षाच्या दृष्टीनें उपकारक होऊन रहाणारा त्याग होय.

मी देह आहें; दुसरें कांहीं नाहीं, हा जो आपला समज आहे तो साफ खोटा आहे. प्रत्येक बाबतींत जेथें तेथें आमचा अहंकार आड येत असतो. मी हें करतों, मी तें करतों हा खोटा अहंकार. निरनिराळीं इंद्रियें नि मन कामें करीत असतात.

अहंकाराचा त्याग ही साधी गोष्ट नाहीं; परंतु तो करतां येतो. अभ्यासानें करतां येतो. ईश्वरभक्तीकडे आपण लक्ष वळविलें पाहिजे. त्यांत रममाण व्हायला शिकलें पाहिजे. तोच मार्ग दाखविणारा व अहंकार नष्ट करायला लावणारा आहे. जसजशी ईशभक्ति वाढत जाईल तसतसें मन निर्मळ होत जाईल. आपल्या मनांत नेहमीं सद्विचार, सद्भावना वावरत असाव्या. त्यासाठीं सत्संगाची जरुरी आहे. तसेंच सद्ग्रंथांचें वाचन, मननही उपयोगी पडत असतें. ही सतत आचरणांत आणायची साधना आहे. तिचें योग्य तें फळ योग्यवेळीं तुमच्या पदरांत पडल्याशिवाय रहाणार नाहीं.

प्रत्येक माणसाच्यामागें कांहीं ना कांहीं उद्योग हा लागलेलाच आहे. तो करूनच सुटका. जो उद्योग-व्यवसाय आपल्या वांट्यास आला असेल तो शांत चित्तानें मन लावून करावयाचा. हा माझा धर्म आहे, हें माझें पवित्र कर्तव्य आहे, या भावनेनें करावयाचा. राग, द्वेष, मत्सर कोणाहीबद्दल अंतःकरणांत बाळगावयाचा नाहीं. फळाची इच्छा-अपेक्षाही बाळगायची नाहीं. मन निर्विकार ठेवण्याचा सतत प्रयत्न करण्यांत आला पाहिजे. सुखोपभोग विषय यांचें चिंतन साफ सोडून दिले पाहिजे. त्या चिंतनामुळें मनाची शांति ढळते. मन अशांत झाले म्हणजे तुम्हांला सुख नि समाधान कोठून बरं मिळणार ?

साधकानें सर्वांठायीं बंधुभाव, प्रेमभाव उत्पन्न केला पाहिजे. सर्वांठायीं एकच आत्मा वास करीत आहे. तो आत्मा म्हणजे परमेश्वर. तो जर सर्वांठायीं आहे

तर आपण सर्वांभूतीं भगवंत पाहून त्यांच्याशीं प्रेमभावानें वागायला नको कां ? जसा मी तसे इतर. माझ्यांत नि इतरांत भेदभाव कांहीं नाहीं. शरीर हें नाशवंत आहे; परंतु त्या शरीरांत वास करणारा आत्मा अमर–अविनाशी आहे. तो सर्वांठायीं आहे ही खूणगांठ आपण आपल्या मनाशीं पक्की बांधून ठेविली पाहिजे. या विचारांवर आपली अखंड श्रद्धा बसली पाहिजे. सतत अभ्यासानें ती वाढविली पाहिजे.

हा एक प्रकारचा अभ्यास आहे. साधकानें त्या अभ्यासाकडे सतत लक्ष पुरविलें पाहिजे. तो त्याच्या निदिध्यासाचा विषय झाला पाहिजे. अभ्यासानें साध्य होत नाहीं असें या जगांत कांहीं नाहीं.

चित्ताची शांतता ही और चीज आहे. ती प्रयत्नेकरून, सतत अभ्यासानें आपण प्राप्त करून घेतली पाहिजे. ज्यानें चित्ताची शांतता मिळविली त्यानें पुढील यशाचा मार्ग मोकळा करून घेतला असें म्हणतां येईल.

आत्मा नित्य, निरंजन, निराकार व निर्विकार आहे ! आत्मा हा सदासर्वकाळ मुक्त आहे. त्याला मोक्ष नको. मोक्ष पाहिजे चित्ताला. हा संसार आपण थाटतों. चित्ताची इच्छा. सुख, दुःख, भोग हे सारे चित्तामुळे. चित्त आत्म्यांत विलीन झालें पाहिजे. त्याचेंच नांव मुक्ति–मोक्ष. चित्ताचें जिवंतपण म्हणजे हा संसार. जेव्हां सुखोपभोग वासना नाहींशा होतील तेव्हां चित्ताचें सामर्थ्य क्षीण होईल.

त्यासाठीं आत्मविचार, आत्मचिंतन, सत्संग व नामस्मरण यांची सतत कांस धरली पाहिजे. नामस्मरण, सतत नामस्मरण. त्याविना एक क्षणही वाया दवडायचा नाहीं.

त्यासाठीं पुढील अर्धश्लोक आपण नेहमीं घोळवीत रहावें.

**न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा.**



# श्री अरविंद वाणी

## भगवत्प्राप्तीचे तीन मार्ग

ध्यान हें एक भगवत्प्राप्तीचें साधन असून त्याचें महत्त्व विशेष होय. पण ध्यानमार्ग हा कांहीं जवळचा मार्ग म्हणतां येत नाहीं. या मार्गानें जर साधकाचे ठिकाणीं भगवत्-शक्तीचें अवतरण घडत नसेल तर तो जवळचा मार्ग होऊं शकणार नाहीं.

कर्ममार्ग हा ध्यानमार्गापेक्षां बराच सुकर मार्ग; मात्र भगवत्प्राप्तीचा विसर पडून केवळ कर्मांवरच साधकाचें मन खिळून रहातां कामा नये. भगवत्प्राप्ति हेंच ध्येय असलें पाहिजे. अंतःपुरुषाशीं संयोग ठेवण्याच्या दृष्टीनें काव्यादींचा उपयोग होतो आणि असा संयोग राखतां आला तर साधकास आत्म्याशीं प्रत्यक्ष संयोग घडवून आणण्यास सहाय्य होतें. परंतु साधकानें काव्यादींतच गुंतून पडतां कामा नये; खरी वस्तु शोधत शोधत पुढें गेलंच पाहिजे. लेखन-काव्य-चित्रकला या लेखन-काव्य चित्रकला यासाठींच हस्तगत करण्याजोग्या आहेत असें जर वाटत असेल तर त्यांत योगदृष्टि नाहीं, योग्यास शोभणारी वृत्तीच नाहीं. अतएव योगी होणें हेंच आपलें उद्दिष्ट.

प्रेम, भक्ति, समर्पण, अंतरात्म्याचें उद्घाटन हेच भगवत् प्राप्तीचे जवळचे मार्ग होत किंवा होऊं शकतात; पण प्रेम नि भक्ति ही जर अत्यधिक भावनाधिष्ठित असतील तर एका बाजूस दिव्यानंदाची अपेक्षा तर दुसऱ्या टोकास विरह, अभिमान, निराशा इत्यादि. या दोहोंत हेलकावे खात रहाण्याचा संभव असतो आणि मग ही विशरी जवळची वाट म्हणजे थेट मुक्कामास पोहोंचविणारें उड्डाण न ठरतां ती दूरची आणि नागमोडी घाटाप्रमाणें ठरते. ईश्वरप्राप्तीप्रीत्यर्थ जोराची धाव न ठरतां साधकास स्वतःच्या अहंकाराभोंवती घिरट्या घालावयास लावणारी ठरते.

× × ×

## जप

दोन गोष्टीपैकीं जर एक शक्य असेल तर जप साधारणतः यशस्वी होतो. एक म्हणजे जपाच्या अर्थाची जाणीव ठेवून, ज्या देवतेचा जप करावयाचा तिचें स्वरूप, सामर्थ्य, सौंदर्य नि आकर्षण यावर मनांतील कोणत्यातरी

अंशानें लक्ष एकाग्र करून जप केला तर तो फलदायी होतो. कारण जपाच्या उच्चारानें याच गोष्टी व्यक्त होऊन त्या साधकाच्या जाणीवेंत उतरून तेथें बिंबावयाच्या असतात. जप करण्याची ही मानसिक पद्धति.

जप हा जर हृदयांतून उत्स्फूर्त होईल किंवा जाणीवपूर्वक केल्यानें किंवा कांहीं भक्तिभावानें एक प्रकारच्या जिवंतपणानें जर तो जप हृदयांत घुमत राहील तर तोही जप फलदायी होतो. ही जप करण्याची दुसरी भावनाप्रधान पद्धति. मन किंवा भावना यापैकीं कशाचा तरी जपास आधार वा पुष्टि असावी लागते. पण जर का जपानें मन रुक्ष नि भावना प्रक्षुब्ध होतील तर वर सांगितलेला आधार व पुष्टि जपास मिळत नसली पाहिजे असें निश्चित समजावें.

जप करण्याची आणखीही एक पद्धत आहे. या पद्धतींत मंत्रशक्ति किंवा नामसामर्थ्य यांचा आधार घेतलेला असतो. मात्र अंतर्यामीं या जपाचें स्पंदन स्पष्टपणें उमटेपर्यंत जपाच्या प्रयत्नांत रहावें लागतें, आणि असें स्पंदन निर्माण होऊं लागलें म्हणजे कोणत्याही क्षणीं दिव्य शक्तीच्या अस्तित्वाचा प्रभाव वा स्पर्श एकदम स्वीकारतां येणें शक्य होतें. पण अमुकच परिणाम घडून यावा अशा प्रकारची साधकाचे ठिकाणी आग्रही वृत्ति किंवा प्रयत्न असेल तर मात्र या दिव्यशक्तीचा स्पर्श किंवा प्रभाव स्वीकारण्याच्या मार्गांत बरेच अडथळे निर्माण होतात; कारण दिव्यतेचा स्वीकार करतांना मनाचे ठिकाणीं अचंचल राहून ग्रहण करण्याची पात्रता असणें आवश्यक असते. म्हणूनच मनाच्या शांत म्हणजेच अचंचल स्थितीवर मी इतका भर दिला. या बाबतींत ओढाताण करणें किंवा परिश्रम करणें यावर मात्र तितकासा दिला नाहीं.

शांत मनःस्थितीमुळें चैत्य पुरुषास किंवा मनास दिव्य शक्तीचा स्वीकार करण्याकरितां लागणारी योग्य ती अवस्था विकसित करावयास वाव रहातो. काव्य-संगीत विषयक स्फूर्ति जशी सहजपणें येते तशीच या बाबतींतही ग्रहण करण्याची क्षमता स्वाभाविक होऊन जाते. दिव्यशक्तीच्या स्वीकारासाठीं जी साधकाची सिद्धता व्हावयाची असते तत्प्रीत्यर्थ काव्य साह्य करतें, अडवणूक करीत नाहीं. कारण दिव्यशक्तीचा स्वीकार करण्यास लागणाऱ्या योग्य मनःस्थितीचा विकास करण्याचें आणि सुप्त असलेली भक्ति व्यक्ततेस आणण्याचें काव्यरचना हें एक साधन आहे.

जप किंवा ध्यान यामध्यें सारी शक्ति वेचण्यानें जो ताण पडतो तो ध्यान करण्याची चांगली संवय असलेल्यांनाही सहन करणें कठिण पडतें; फक्त आध्यात्मिक अनुभव जर सतत येत राहतील तर हा ताण टिकविणें साधकास शक्य असते.

× × ×

## वैराग्याचें वैराग्य किंवा तमोगुणी वैराग्य

वैराग्याचें वैराग्य किंवा तमोगुणी वैराग्य याला मी पूर्वी विरोध दर्शविला आहे. जीवनाचा खरा कंटाळा आला म्हणून नव्हे, तर जीवनाला तोंड देतां येत नाहीं किंवा जीवनाच्या शर्यतींत पारितोषिक मिळवितां येत नाहीं म्हणून— अशा तऱ्हेच्या पराभूत जीवनांतून—निर्माण झालेली जी वृत्ति, त्याला मी वैराग्याचा तमोगुणी प्रकार असें म्हणतों. अशा तऱ्हेचा मनुष्य, लुळयापांगळया आणि दुबळया लोकासाठीं असलेलें एक प्रकारचें रुग्णालय म्हणजे योग असें समजून तिकडे वळतो; आणि जगाच्या शाळेमध्यें जीं मुलें अयशस्वी झालीं त्यांना उत्तेजनार्थ मिळणारें पारितोषिक म्हणजे 'ईश्वरप्राप्ति' असें समजून ईश्वराकडे वळतो. ज्यानें जगाच्या सर्वसंपन्नतेचा आस्वाद घेतला आहे, सर्व प्रकारचें यश मिळविलें आहे, तरीसुद्धां या सर्व गोष्टी ज्याला अपुऱ्या वाटतात किंवा शेवटीं नीरस वाटतात, म्हणून जो उच्चतर व अधिक उत्कृष्ट, सुंदर ध्येयाकडे वळतो, त्याचें वैराग्य किंवा जीवन संग्रामांतील आपली लढत योग्य प्रकारें लढूनही आपल्या आंतरिक जीवनाप्रीत्यर्थ आपणाकडून कांहीं तरी अधिक अपेक्षित आहे, असें ज्याला प्रत्यक्ष दिसतें त्याचें वैराग्य योगमार्गाला संपूर्णतः साह्यकारी आहे. योगमार्गाकडे जाण्याचें तें एक उत्तम प्रवेशद्वार ठरतें. त्याचप्रमाणें जीवन हें काय आहे याचें निरीक्षण करून त्याच्यापेक्षां उच्च किंवा पलीकडे जाण्याचा प्रयत्न करणारें सात्विक वैराग्यही उपयोगी पडते; पण जीवनाचा आणि जगाचा, दोहोंचाही एकाच वेळीं सर्वस्वी त्याग करून अज्ञातामध्यें विलीन होऊन जाण्याची इच्छा करणें याला मी 'वैराग्याचें वैराग्य' म्हणतों. माझ्या योगाकडे जे वळतात, त्यांच्यासाठीं मी असलें वैराग्य त्याज्य समजतों. कारण 'जीवनांत ईश्वरास अभिव्यक्त करण्याचें' माझ्या योगाचें ध्येय आणि हें वैराग्य एकत्र नांदूं शकत नाहींत. तरीही आजच्या या जीवनावर जर एकादा संतुष्ट असेल तर त्याच्या दृष्टीनें जीवनांत ईश्वराचा अवतार घडविण्याचेंही कांहीं कारण नाहीं. म्हणून आजचें जें आहे त्यांत असमाधान वाटणें या अर्थानें वैराग्य संपूर्णतः स्वीकार्य आहे. एवढेंच नव्हे तर एका अर्थानें असें वैराग्य माझ्या योगामध्यें अनिवार्यपणें आवश्यक आहे.

× × ×

## प्राणशक्तीवर प्रभुत्व

मोठ्यांत मोठे श्रम श्वासोच्छ्वास थांबवून करण्यांत येतात. जितका जोरानें, जलद श्वासोच्छ्वास होतो तितकी शक्ति अधिक खर्च होते. काम करतांना स्वाभाविकपणें अबुद्धिपुरःसर जो आपला श्वासोच्छ्वास थांबवूं शकतो त्याचा प्राणावर ताबा

आहे असें समजावें. विश्वांत सर्वत्र निर्मिती व इतर कार्य करणारी ही शक्ति म्हणजेच प्राणशक्ति होय. योग्याचा हा अगदीं नेहमींचा अनुभव आहे कीं, विचार करणें, विचार येणें जाणें, थांबलें कीं, श्वासोच्छ्वास थांबतो. हठयोगी महान् प्रयासानें, अपार कष्टानें जो पूर्ण कुंभक सिद्ध करतो तो राजयोग्याला अनायासें सुलभ रीतीनें साधतो. योग्याचें थांबलेलें विचारचक्र पुनः सरू झालें कीं, श्वासोच्छ्वास पुन्हा चालू होतो. विचारचक्र पुनः चालू होऊनही श्वासोच्छ्वास थांबलेला पुन्हा चालू न झाला, पुनः चालू करावा न लागला म्हणजे प्राणशक्तीवर पूर्ण ताबा आला असें समजावें.

## निश्चलतेचे दोन प्रकार

निसर्गाचा, प्रकृतीचा असा कायदा आहे कीं, आम्ही आयास करून कांहीं करू लागलों कीं, निसर्गाच्या शक्ती आमच्यावर मात करूं लागतात. आम्ही निश्चलता धारण केली कीं त्या शक्ती आमच्या ताब्यांत येतात. मात्र निश्चलतेचे दोन प्रकार असतात. एक प्रकार म्हणजे असहायतेची दर्शक अशी जड निश्चलता. ही मरण जवळ आल्याची सूचना देणारी आहे. दुसरा प्रकार म्हणजे योग्याची निश्चलता. जीवनाच्या सर्वांगांचा परस्परांशीं पूर्ण सुसंवाद घडवून आणून जीवनक्रम सुरेल, सुयंत्रित करण्याचें सामर्थ्य ज्या आत्मजयांत आहे तो आत्मजय पूर्णतया सिद्ध झाला आहे हें दर्शविणारी निश्चलता. ही जी आत्मजयाची, आत्मप्रभुत्वाची निश्चलता, ती म्हणजेच योग्याची शांति. ही शांति जितकी अधिक पूर्ण, तितकी त्याची योगशक्ति अधिक सामर्थ्यवान्, क्रियाशक्ति अधिक संपन्न.

× × ×

## नियतीचा संसार

नियति किंवा दैव ही कल्पना, सर्व काळांतील व खंडांतील लोकांना पटलेली आहे. निदान त्यांनीं तिचा खेळकर मनोवृत्तीनें उपयोग केला आहे.

ग्रीक लोक असें मानीत होते कीं, त्यांच्या देवदेवता देव सुलभ लहरीनें वागत असल्या तरी या त्यांच्या अध्यक्षत्वानें नियमन करणारी, नियति म्हणून एक रहस्यमय व वर्णनातीत देवता आहे.

'किस्मत्'चें जोखड मुसलमानांच्या मनावर असतें आणि 'किस्मत्' असें म्हणून मुसलमान शांत निष्क्रिय बसून राहतो.

कर्म आणि भाललिखित, असें म्हणून संकटांत सांपडलेला हिंदू आपल्या मनाचें सांत्वन करतो. अपयश आलें असतां तो याच प्रकारें आपलें सांत्वन करतो. त्याला

मर्दासारखा चिकाटीचा प्रयत्न करावयाचा नसला, म्हणजे ‘कर्म व कपाळ’ हीच भाषा तो वापरतो.

या सर्व कल्पना एका सत्य कल्पनेच्या किंवा सत्याच्या सारख्या प्रकारच्या छाया आहेत. या छाया त्या सत्याचें सामान्य, अर्धवट दर्शन घडवितात त्या सत्याचा अंतिम अर्थ व महत्त्व या छायांत अंधुकपणें प्रतीत होते, यथार्थतेनें व स्पष्टपणें उघड होत नाहीं.

निसर्गाचे नियम आणि आनुवंशिक संस्कार हे व्यक्तीच्या अंतर्बाह्य हालचाली निश्चित करतात, असें आधुनिक विज्ञान शिकवितें. इच्छा करण्यास व क्रिया करण्यास व्यक्ति स्वतंत्र आहे, म्हणून तिच्या इच्छाबद्दल आणि क्रियांबद्दल ती जबाबदार आहे, या कल्पनेशीं विरोधी, अशी ही, नव्या विज्ञानाची शिकवण आहे. परंतु जुन्या नियती-प्रमाणें, निसर्गाची व अनुवंशाची नियति देखील लहरी व विकृत स्वरूपाची आहे. देहाव्यतिरिक्त, देह धारण करणारा देही, आत्मा नाहींच असें नवें विज्ञान सांगतें. अर्थात् आत्माच नाहीं, तर स्वतंत्रता ही कल्पनाही खोटीच. मानवामध्यें निसर्गाचा मूळ कायदा आपली क्रिया करीत असतो, ही पहिली नियति. गतकालीन मानवी पिढ्या, मातांच्या द्वारां नव्या जन्मणाऱ्या मानवांत आपले गुणावगुण संक्रमित करितात, ही दुसरी महत्त्वाची नियति. यानंतरची तिसरी नियति म्हणजे परिस्थिति—तिचें मानवावरील दडपण. निसर्गाच्या व अनुवंशाच्या अगणित शक्तींच्या जाळ्यांत बांधला गेलेला मानव, परिस्थितीच्या कोंडींत घातला गेल्यानें त्याला एवढीशीही स्वतंत्रतेची संधि नाहीं, असें नवें विज्ञान शिकवितें.

ग्रीकांच्या, नियति—देवता—त्रयाच्या ठिकाणीं नव्या विज्ञानानें त्याच देवता नव्या नांवांनीं आणि रूपांनीं सजवून सिंहासनावर बसविल्या आहेत. ग्रीकांप्रमाणेंच आधुनिक श्रद्धा अशी आहे कीं, नियतीचें प्रचंड जाळें, आम्हां मानवांना बांधण्या-करितां विणलें जातें—फरक एवढाच कीं, हें जाळें प्रचंड अशा भौतिक शक्ति आपल्या तालबद्ध नृत्यानें विणीत जातात. वस्तुतः जुन्या देवतांची बुद्धि व मानवी सहानुभूति काढून घेऊन, अशा रीतीनें आम्ही त्यांनाच नवीन स्वरूप दिलें आहे; आणि या नव्या रूपांत त्याच जुन्या देवता, स्वतःची किंवा आमची त्यांना मुळींच जाणीव नसल्यामुळें, मानवाला त्या कसलीही दयामाया दाखवूं शकत नाहींत.

# जन्मा येउनि एकदां तरी शिरडीला जावें

**चाल : गझल**

जन्मा येउनि एकदां तरी शिरडीला जावें
श्रीसाईंचें भक्तिभावें दर्शनही घ्यावें

राव रंक अन् लुळे पांगळे येती भेटीला
प्रसादरूपी भिक्षा मागति पावन होण्याला
साई साई मंत्र हा सोपा वदति प्रेमभावें
श्रीसाईंचें भक्तिभावें दर्शनही घ्यावें

फल पुष्पांच्या माला आणिक मौल्यवान् भेटी
साई समाधीवरों अभिषेक कितीतरी होती
धूनीमधली उदी लावुति भाळि प्रेमभावें
श्रीसाईंचें भक्तिभावें दर्शनही घ्यावें

ऋषी मुनी अन् महान् साधु येती दरबारी
हरे हरे रामा! हरे हरे साई गर्जति वारकरी
श्रीसाईंचें गीत गायनीं प्रेमानें गावें
श्रीसाईंचें भक्तिभावें दर्शनही घ्यावें

संसारांतील पाश तोडुनि शिरडीला जावें
भक्ति सुखाचे अन् प्रेमाचे धागे जुळवावे
या धाग्याचें वस्त्र विणोनी साईंस अर्पावें
श्रीसाईंचें भक्तिभावें दर्शनही घ्यावें

—दत्तात्रय बळवंत पोतनीस

# श्रद्धावान् लभते ज्ञानं

## ( लेखांक ३ रा )

लेखक : **केशवराव कृष्ण प्रधान**

श्रद्धेच्या सर्व आंगोपांगांचा पूर्ण विचार मागील दोन लेखांत केल्यावर या श्रद्धेवरील शेवटच्या लेखात आपण श्रद्धा या विषयाच्या सखोल तत्त्वज्ञानात प्रवेश करूं, श्रद्धेच्या तात्त्विक पाया काय आहे हे पाहूं.

सर्वं धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वां सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मां शुचः। या भगवंताच्या फार मोठ्या आश्वासनांत श्रद्धेचे सर्व तत्त्वज्ञान सामावलेलें आहे. ' सर्व,धर्मान्परित्यज्य ' याचा अर्थ तुझ्या शरीराचे, मनाचे, हृदयाचे, बुद्धीचे सर्व गुणधर्म म्हणजे विसरून मगच मला शरण ये म्हणजे मी तुला सर्व पापातून म्हणजे भवदुःखातून सोडवीन असा आहे. श्रद्धेचा पाया हा अशा तऱ्हेच्या शरणांगतीतच आहे. योगवासिष्ठ्य ग्रंथांत सर्व जड–अजडाची, चरा–चराची निर्मिती एका अहं या मनोभावनेने निदर्शित केलेल्या प्रकारातून झालेली आहे, असें श्री वसिष्ठ ऋषींनीं प्रतिपादन केलेले आहे. अहं हे विश्वनिर्मितीचे मूळ असून सर्व मायामय जगताचे बीज आहे. मातीच्या कणात असलेल्या निरानिराळ्या अणू–परमाणूंची एकत्रित येण्याची, संघटन पावण्याची, जी क्रिया ती या अहं मधूनच निर्माण झाली आहे. विज्ञानशास्त्रांत ' Admision is the basic quality of matter ' असे जे म्हणतात तीच सर्व खनीज सृष्टीची अहंता असून त्यांच्या निर्मितीचें मूळ आहे. अणू–परमाणूंच्या एकत्रित येण्याशिवाय व विशिष्ट तऱ्हेनें त्यांच्यांत संघटितपणा आल्याशिवाय खनीज सृष्टीची, वनस्पति सृष्टीची व त्यांत दिसणाऱ्या निरनिराळ्या आकाराच्या वस्तुमात्रांची निर्मितीच शक्य नाहीं हें उघडच आहे. Voltage Hores Powar हा या अहंतेचाच प्रकार असून अलीकडील अणू–केंद्रे या खनिज सृष्टीतलि अहंतेचाच मूळ शोधून त्याच्या विध्वंसामधून निर्माण होणाऱ्या भयंकर जग संहाराच्या साधनांचा शोध लावित आहेत, असे आपणांस दिसून येईल. चर सृष्टी-मध्यें थेट कृमि–कीटकांपासून ते मानवयोनीपर्यंत या अहं ची परिणिती ' बळी तो कान पिळी ', ' हं करे सो कायदा ', ' Might is Right ', लहान माशाला मोठ्या

माशानें गिळणे, बलवान पशूने कमजोर पशूस मारणे, जीवो जीवस्य जीवनं या शारीरिक व संस्कारात्मक प्रकारात आपणास दिसून येते. Survival of the fittest' ही अहं वृत्तीची परिणती केवळ पशुयोनीपुरती राहिली नसून हल्लींच्या भांडवलशाही युगांत थेट मानवापर्यंत येऊन पोहोचली आहे. मानवांत द्वेष, क्रोध, मत्सर, असूया वगैरे दिसणारे विकार या अहंतेतूनच निर्माण झाले आहेत व त्यामुळें जगांत भयंकर युद्धे व रक्तपात घडून आले आहेत. या अहंतेतून सुटका होण्यासाठीं फार पुरातन काळापासून निसर्गानें मानवाच्या मुक्ततेसाठीं प्रयत्न सुरू केले आहेत. कळप करून रहाण्याचे प्रकार कृमि–कीटकापासून पशू–पक्षापर्यंत सहजगत्या दिसून येतात. त्यांची परिणिती रानटी युगाच्या शेवटी मानवांतसुद्धां दिसून येऊं लागली व त्याचीच आधुनिक स्वरुपे Co-operation, democracy, live & let live अशा सारख्या उच्च प्रणालींत होऊन जग झपाट्यानें एक मानव-जातीकडे किंवा विश्वबंधुत्वाकडे झुकू लागले आहे याची चिन्हे आपणास दिसूं लागली आहेत. अहं भावाची निर्मिती हे मूळ व अहं भावाचा पूर्ण निरास हा शेवट या दोन टोकात जगाच्या संस्कृतीचा सर्व इतिहास भरलेला दिसतो. एवढे सर्व लिहिण्याचे कारण असे की, हल्लीच्या बुद्धीयुगामध्ये जी बुद्धीवाद्याची अहं भावना जास्त जोमानें फोफावू लागली आहे असे आपणाला दिसते, त्याचा अर्थ एवढाच करावयाचा आहे की, दिवा विझताना जसा एकाएकी मोठा होतो किंवा माणूस मरताना एकाएकी शुद्धीत येऊन ताजातवाना दिसतो तशीच ही अहं भावना आता शेवटचे आचके देत असावी. या अहं भावनेचा पूर्ण निरास अतिशय सुलभ तऱ्हेने करण्यासाठीच तत्वतः श्रद्धेची अत्यंत जरुरी आहे व श्रद्धेचें खरेखुरे फळ शरीर, मन, बुद्धीच्या सर्व गुणधर्मांना परमेश्वराच्या ठिकाणी वाहून त्याला शरण जाण्यातच मिळणार आहे हे आमच्या बुद्धीमंताना जितके लवकर कळेल तितका त्यांचा दुःख-निरास जलद होईल असे खात्रीने वाटते. सर्व संस्कृतींची परिणिती जी जीवनमुक्त अवस्था ती सर्व व्यवहारिक, आर्थिक, ऐतिहासिक, भौगोलिक आणि पारमार्थिक प्रांतातून एक समावेच्छे करून अगदी हाता तोंडाशी आली असताना मीच शहाणा, कारण मी विद्वान आहे, मी विविध ग्रंथातून फार ज्ञान म्हणजे केवळ माहिती गोळा केली आहे याचा टेंभा मिरविणाऱ्या बुद्धीमंताचे डोळे जेवढे लवकर उघडतील तेवढे हे साध्य जगाच्या लवकर हातात येणार आहे.

गेल्या महायुद्धात अखेरीस प्रेसिडेंट रुझवेल्ट यांनी सदीच्छेने निर्माण केलेली 'लीग ऑफ नेशन्स' ही राष्ट्रकूल संस्था मानवाच्या या अहंतेनेच पार रसातळाला गेली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आतापर्यंत कसाबसा जीव धरून राहिलेली 'युनो' ही राष्ट्रकूल संस्था मानवाच्या या


अहंवृत्तीतून निर्माण झालेल्या हायड्रोजन बॉम्ब व ॲटम बॉम्ब यासारख्या भयानक जग संहारक अस्त्रांमुळें सर्व जगाबरोबर होरपळून निघते की काय अशी भीति निर्माण झाली आहे. मानवा—मानवामधील श्रद्धा हीच बहुसंख्य प्रमाणांत निरनिराळ्या राष्ट्रा—राष्ट्रांमधील श्रद्धा होते. त्यात कवळ विज्ञान शास्त्राने लावलेल्या अलौकीक शोधामुळें अणूपासून परमेश्वराचे सर्व प्रांत फक्त आपल्या बुद्धी प्रकर्षांत आपण खचित पकडू असा गर्व करायचे मानवाने सोडल्यास व श्रद्धेची खरीखुरी कास धरल्यास सर्व जगाचे हित त्यात होणार आहे व त्यातूनच खऱ्याखुऱ्या संस्कृतीचा जन्म संभवतो.

श्रद्धेचे महत्त्व जेवढे सांगावे तेवढे थोडेच आहे. मागील लेखात श्रद्धा ही भावना असून त्या भावनेमध्यें शरणागती असल्यामुळें बुद्धीचे आणि शरीराचे दोन्हींचे धर्म आपल्या ठिकाणी खेचून घेण्याची शक्ति आहे व म्हणूनच श्रद्धेला ज्ञानचक्षु प्राप्त होतात व 'श्रद्धावान लभते ज्ञानं' हे भगवंताचे वचन-देखील सार्थ होते. ईश्वर सर्व भूतांना हृद्देशे तिष्ठति अर्जुन। किंवा 'हृदयकुहरामध्यें केवलं ब्रह्ममात्रा' अशासारखी वचने पण हृदयाचीच महति गातात म्हणजे मानवाच्या सर्व निर्मितींत हृदय ही एकच अशी जागा आहे, ज्या ठिकाणीं त्याला ब्रह्माचा साक्षात्कार होतो हे ह्या वचनावरून उघड आहे. ब्रह्म साक्षात्कार शरीरांत होत नाहीं, बुद्धीत होत नाहीं, परंतु ज्या मानवी हृदयात शरीर, भावना व बुद्धी यांचा मिलाफ होतो तेथें होतो. वेदांतिक भाषेंत बोलावयाचे तर सद् चिद् आनंद या त्रयींचा मिलाफ आनंद म्हणजे हृदय येथें होत असून बुद्धीतील सत् आणि शरीरांतील चिद् या आनंदाला मिळण्याकरितां हृदयाकडेच धांव घेतात. ध्रुवाख्याना-मध्यें ध्रुवाला अढळपद प्राप्त करून देणारा परमेश्वर, प्रल्हादाला अणुरेणूमध्यें दिसणारा परमेश्वर प्रथम या बालकांच्या हृदयांतच प्रविष्ट होऊन त्यांना साक्षात्कार करता झाला. श्री साईलीलेंत पूर्वी सद्गुरूंच्या शोधांत या लेखमालेंत मी एकंदर ११ लेख लिहिले आहेत, त्यांतील दहाव्या लेखांकांत मनुष्याचा शरीर, मन, बुद्धीचा वैद्यकीय दृष्टया विचार केला आहे. त्या ठिकाणीं शरीरांत ज्याला आपण मेंदू म्हणतो तो बुद्धीनिदर्शक व पोटाच्या ठिकाणी असलेला परंतु पूर्णपणे अजून शोध न लागलेला असा Abdominal Brain या दोन्ही मेंदूच्या संवेदनांचा सुंदर मिलाफ माणसाच्या हृदयांत होऊन भावनेला बुद्धीचे चक्षु कसे मिळतात हे मी विशद करून सांगितले आहे. ती भावना म्हणजे हीच श्रद्धा होय, हे चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आलेच असेल. या श्रद्धामय साक्षात्कारालाच श्री अरविंद 'सायकीक बीइंग' असे म्हणतात.

श्रद्धेचा पाया हा परमेश्वराकडे पूर्ण शरणांगती हा आहे हे आपण वर पाहिलेच

आहे. केवळ परमेश्वराची चालतीबोलती प्रतिके म्हणून आपण सत्पुरुषांकडे आदराने पाहतो. 'संत माझी सचेतन मूर्ति' असे खुद्द भगवंतानेच भागवतात म्हटले आहे. अशा सद्गुरुपदाला लायक, श्रेष्ठ पुरुषाला शरण जाणे हाच साक्षात्काराचा मार्ग आपण नेहमी अवलंबतो. 'आपणासारखे करिती तात्काळ, नाही काळ वेळ तयालागी' असे दुर्मिळ पण साक्षात्कारी सत्पुरुष आपणास हमखास साक्षात्कार घडवून देतात, अशी श्रद्धा बाळगून जर आपण त्याना शरण गेलो तर त्यात वावगे कांहीं होणार नाही हे आतापर्यंतच्या विवेचनावरून आपल्या ध्यानांत आले असेलच. याच संदर्भांत असे नाईलाजाने म्हणावे लागते की, हल्लीं जी एक नवीन समजली जाणारी मतप्रणाली प्रतिपादन केली जाते की Don't follow any authority ती कशी चुकीची आहे हे आपणांस दिसून येईल. निव्वळ बुद्धीच्या जोरावर Self awareness, creativity, understanding वगैरे शब्द फोल व पोकळ अर्थांचे ठरून त्यांचा खराखुरा अर्थ मानवास आकलन होण्यासाठीं शरीर, मन, बुद्धीचा पूर्ण संयोगच पाहिजे आहे हेही आपल्या लक्षांत येईल व म्हणूनच अशा चुकीचे तत्वज्ञान प्रणालीत करणारे लोक मानवाच्या बुद्धीला चाळवतील, परंतु हृदय चाळवून त्यात श्रद्धा निर्मिती करून साक्षात्कार करून देण्यांत क्षम होतील हे अशक्य आहे. साक्षात्कारी पुरुषांना श्रद्धेमुळें खरेखुरे ज्ञान प्राप्त झालेले असते व त्या आत्मज्ञान प्राप्तीमुळें अणुरेणूमध्यें परमेश्वर त्यांना प्रत्यक्ष दिसत असतो. महाशय, Have you seen god ? या श्री विवेकानंदानी विचारलेल्या प्रश्नाला श्रीरामकृष्ण परमहंसांनी Yes, boy I see God more clearly than this wall before me. हे जे उत्तर दिले त्यातील सार हेच आहे.

नवोदित बुद्धीतत्त्वामुळें जगामध्यें श्रद्धेसारख्या अमोलीक देणगीचा मानवजात जो आजकाल अव्हेर करीत आहे तो टाळावा याच कळकळीने ही वरील लेखमाला लिहून ती श्रीसाईचरणी समर्पित करीत आहे.



# विचारशक्तीचा विकास : प्रत्येकाचें आद्य कर्तव्य

जगांत आपण नाना प्रकारचे प्राणी पहातों. जीवजंतू, पशुपक्षी वगैरे; परंतु त्या सर्वांत मानाचें व गौरवाचें स्थान जर कोणाच्या वांट्यास आलें असेल तर तें म्हणजे मानवप्राण्याच्याच होय. याचें कारण काय? कारण एकच. ईश्वरानें त्याला मन दिलें आहे. या मनाचें सामर्थ्य अचाट आहे. मन माणसाला कुठच्या कुठें नेऊन बसवितें. माणसाला मन आहे म्हणून तर त्याला मानव संज्ञा प्राप्त झाली आहे. माणसाला बोलता येते नि विचार करतां येतो. ह्या दोन्ही शक्तींचा मानव वाटेल तसा—बरा व वाईट—उपयोग करूं शकतो. विचार सर्वप्रथम मनांत उत्पन्न होतो व नंतर शरीराकडून अंमलांत येतो.

विचारामुळें मनुष्य सुधारतो किंवा बिघडतोही. मनांत पवित्र विचार यावे. ज्याच्या अंतःकरणांत नेहमीं पवित्र विचार येतात तो पुण्यवान होय; आणि ज्याच्या अंतःकरणांत अपवित्र विचार येतात तो पापी होय.

जसे विचार तसा आचार, विचार शुद्ध असले म्हणजे आपल्याकडून आचरणही शुद्ध घडते. यासाठीं आपल्या अंतःकरणांत पापी, अपवित्र नि दुष्ट विचारांस केव्हांही थारा देऊं नये.

खरें कोणतें, खोटें कोणतें, कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें याचें ज्ञान आपणास विचारामुळें होतें. सुख काय किंवा दुःख काय, सारें कांहीं विचारावर अवलंबून आहे. यासाठीं प्रत्येक माणसानें सुविचारी बनलें पाहिजे. विचार करायला शिकले पाहिजे. विचारशक्ति वाढविली पाहिजे.

या जगांत सभोंवार काय चाललें आहे, अमूक गोष्ट कां घडली, याचा आपण नेहमीं विचार केला पाहिजे. मनाचे डोळे बंद करून ठेवतां कामा नये. उघड्या डोळ्यांनीं सारे व्यवहार केले पाहिजेत.

आनंदाचा खजिना आपल्या अंतःकरणांत भरलेला आहे आणि आपण आनंद मिळविण्यासाठीं सैरावैरा धांवत असतों. आम्हीं कधीं अंतर्मुख होण्याचा प्रयत्न करीत नाहीं. कोहिनूर हिरा आपल्या अंतःकरणात प्रकाशत असतां आम्हीं कांच, दगड, खडे निवडण्यासाठीं बाहेर भटकत असतों.

आपल्या सभोंवार, घरांत नि बाहेर लहानमोठ्या थोड्या थोडक्या का घटना

घडत असतात ? कधीं आपण त्यांच्यावर विचार करीत असतो ? जर विचार केला तर आपला कितीतरी फायदा होईल. कितीतरी गूढ वाटणारीं कोडीं सहजासहजीं उलगडलीं जातील. त्यामुळें आपलें जीवन सुखी होऊं शकेल.

मनुष्यानें अनुभवांचें भांडार आपल्या जवळ भरपूर केलें पाहिजे. आपण प्रत्येक गोष्टींचा कार्यकारणभाव शोधण्याचा प्रयत्न करायचा म्हणजे विचार करायचा.

विचार करण्याची संवय आपण लावून घेतली पाहिजे. त्यामुळें आपला कल्पनातीत फायदा होईल. परंतु आपण आपली विचारशक्ति वाढविण्याकडे लक्षच देत नाहीं.

पुस्तकें भाराभर वाचून त्याचा काय बरे उपयोग ? जें वाचलें, जें पाहिलें नि जें अनुभविलें त्याबद्दल विचार करण्याची संवय लावून घेतली पाहिजे.

तुम्हीं कितीही ग्रंथ वाचा. कितीही थोरामोठ्यांच्या सहवासांत या. तुम्ही स्वतः जोंपर्यंत विचारवंत झाला नाहीं तोंपर्यंत तुमचा कांहींएक फायदा होणार नाहीं.

तुम्हांला वेळोवेळीं जीं कोडी पडतात त्यांचा उकल तुम्हीं स्वतः विचारवंत झाल्याशिवाय कधींही होणार नाहीं. त्याशिवाय तुमच्या मनाला शाश्वत शांति मिळणार नाहीं.

आपल्या जीवनांत क्षणोक्षणी नवनव्या घटना घडताहेत त्या घडताहेत व नाहींशा होताहेत. तुम्ही विचार करीत नाहीं तोंपर्यंत तुम्हांला काय त्याचा उपयोग ?

ज्या घटना घडतात त्यावर निदान त्यांपैकीं प्रमुख घटनांवर तुम्ही विचार केला पाहिजे. त्याबाबतींत स्वतःचें मन बनविलें पाहिजे. लोक म्हणतात म्हणून आपण म्हणायचें याला कांहीं अर्थ आहे का ?

तुम्हांला काय वाटते हें तुम्ही ठरविलें पाहिजे. आणि हें केव्हां ठरवितां येईल ? तुम्ही विचारशक्तीची जोपासना केली असली तर !

मी कोण आहे ? या जगाचा हा पसारा म्हणजे काय आहे ? या जगाशीं व जगांतील माणसाशीं माझा संबंध काय ? इतरांशीं मी प्रेमानें नि मित्रत्वाच्या नात्यानें कां वागायचें ? अमूक एक घटना ही कां घडून आली ? या जगाची रचना अशी वैचित्र्यपूर्ण कां ? या नि अशा गोष्टींचा आपण विचार केला पाहिजे हरप्रयत्नांनीं त्याची उत्तरें शोधून काढण्याचा अविरत प्रयत्न केला पाहिजे.

कां ? व कशासाठीं ? या दोन प्रश्नांवर सर्व विचारसृष्टि अवलंबून आहे. आपल्या आयुष्यांत प्रत्यहीं लहान लहान घटना घडत असतात. त्या कां घडल्या ? कशासाठीं घडल्या ? मला राग आला तो कां आला ? अमूक व्यक्तीनें माझ्याशीं असा व्यवहार कां केला ?

ज्या ज्या घटना घडतात, त्यांच्यामागें कांहीं ना कांहीं कारण असते. त्याची कारण मीमांसा करतां आली पाहिजे. त्यामुळें आपला मार्ग मोकळा होतो. एक दिशा प्राप्त होते. आपणास जें कांहीं करायचें असेल त्यांत सफलता मिळविणें त्यामुळें शक्य होते.

एखाद्या घटनेचा उकल लौकर लागत नाहीं. खरें आहे; परंतु आपण तो विषय विचाराधीन ठेविला पाहिजे. विचार चालू ठेविला पाहिजे. तंद्री लावली पाहिजे. म्हणजे त्या घटनाचा उकल झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

विचाराचें सामर्थ्य अचाट आहे. ती शक्ति आपण प्राप्त करून घेतली पाहिजे. ती प्रयत्नांतीं प्राप्त होते. आणि ज्यांना ती प्राप्त होते त्यांचें जीवन वैभवशाली झाल्या शिवाय रहात नाहीं.

विचारशक्तीचा विकास होण्यासाठीं एकांतवास नि मौन फार उपयोगी पडत असतें. एखाद्या विषयासंबंधी विचार करीत असतां जितकें म्हणून खोलांत शिरतां येईल तेवढें शिरण्याचा प्रयत्न करण्यांत यावा. प्रत्येक प्रश्नाला अनेक बाजू असतात, आपण त्या सर्व विचारपूर्वक समजून घेतल्या पाहिजेत.

महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, आपण कोणतीही गोष्ट कशीतरी न उरकतां ती विचारपूर्वक हाताळली पाहिजे. विचारशक्ति त्यासाठीं जागी केली पाहिजे. तिचा विकास व्हावा यासाठीं झटलें पाहिजे.



# यापेक्षा अधिक काय मिळवायचें ?

लेखक :—आप्पाराव

जरूर तीं साधनें सन्निध असूनही मनुष्य दुःखीकष्टी स्थितींत काळ कंठीत असतो. असें होण्याचें प्रमूख कारण कोणतें याचा आपण कधीं विचार केला आहे का ? दुःखाचें प्रमूख कारण अंतःकरणांत पेटत राहिलेला असंतोष !

मला हें पाहिजे, मला तें पाहिजे. याशिवाय मी सुखी होणार नाहीं ही तृष्णा माणसाला नेहमीं सतावीत असते. ती त्याला कधींही स्वस्थता भोगूं देत नाहीं. तुमची एक आवश्यकता पूर्ण झाली तरी तिच्या मागोमाग दुसरी आवश्यकता पाठलाग करीत येत असते. त्या गरजांना अंतच नसतो. त्या गरजा भागविण्यासाठीं माणसाची धडपड सतत चालूच असते. त्याला संतोष–समाधान कोठून बरं मिळणार ? सुखाची कितीही साधनें जवळपास असूं द्या. लोभी माणसाला आणखी कशाची तरी गरज भासतेच भासते.

आपलें जीवन कसें साधेंसुधें असावें. साध्या जीवनांत सुख असतें. त्यासाठीं जास्त व्याप, संताप करावा लागत नाहीं. वृत्ति कशी असावी ? आहे त्यांत समाधान मानून रहाणारी असावी.

साधें जीवन जगण्यासाठीं माणसाचा कामधंदा जरूर करावा लागतो तो केलाच पाहिजे व संसाराला साधें जीवन घालविण्यासाठीं जरूर ते द्रव्य मिळविलें पाहिजे. पाहिजे. त्यासाठीं आपल्या वाट्यास जें कांहीं काम आलें असेल तें इमानें इतबारें करायचें आणि मोकळा व्हायचें. कामधंदा कोणालाही सुटलेला नाहीं. कर्तव्यकर्म समजून वांट्यास आलेला उद्योग करावयाचा.

मनुष्यानें अवास्तव हांव–लोभ बाळगूं नये. इतरांजवळ अमूक तमूक सुखसोयी आहेत. माझ्यापाशीं त्यांचा अभाव आहे. मी त्या मिळविल्या पाहिजेत असें वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. येथें चढाओढ कशाला ? फाजील व अनावश्यक गोष्टींकडे आपण कां बरं लक्ष पुरवावें ? ज्याच्यामुळें नडतें ती नड काढून टाकली पाहिजे; परंतु आपण नसत्या अडी–नडी निर्माण करतों त्यांचें काय ? त्याच आपल्या असंतोषाला नि दुःखाला कारण होत असतात.

जीवन कसें सहज सुंदर असावें, त्यांत सहजता असावी. त्यांत अडथळे नसावे, अभावाची जाणीव नसावी, तेथें समाधानाला भरपूर जागा असावी.

सुख कशांत असते ? सुखाचा महामंत्र कोणता ? सुख संपत्तीत नाहीं. सुख विशिष्ट स्थितींत नाहीं. सुख आहे संतोष वृत्तींत. माझ्या जवळ हें नाहीं, माझ्या जवळ तें नाहीं, माझ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांजवळ मात्र तें आहे. ह्या विचारांस आपल्या अंतःकरणांत कधींही थारा मिळूं नये.

माझ्या जरूर त्या गरजा भागविण्यापुरतें देवदयेनें माझ्यापाशीं आहे. जें आहे त्यांत मी सुख व समाधान मानून रहायचें आहे, हा सुखाचा महामंत्र आहे आणि त्याला आपण घट्ट चिकटून राहिलें पाहिजे.

मनुष्य संतुष्ट नि आनंदी केव्हां राहूं शकतो ? जें देवानें दिलें आहे व जें मी जरूरीपुरतें मिळवित आहे तें मला पुरेसें आहे. त्यापेक्षां अधिक मला काय करायचें आहे ? ही वृत्ती अंगी बाणली पाहिजे. मला अधिक पाहिजे, जरूरीपेक्षां अधिक पाहिजे, ही जी लालसा अंतःकरणांत वास करीत असते, तीच असंतोषाचा अग्नि पेटवीत असते. आणि तो अग्नि जोंपर्यंत पेटत राहील तोंपर्यंत माणसाला सुख मिळणें शक्य नाहीं. तो जाळणारा अग्नि आपण मूलतः विजवून मोकळें झालें पाहिजे.

ईश्वर परम दयाळू आहे. त्यानें जन्म दिला. तोच आपल्या पालन पोषणासाठीं अत्यंत आवश्यक तें आपणास पुरविणारा. अशी श्रद्धा आपण कां बरं बाळगूं नये ? त्याच श्रद्धेच्या छायेंत आपण वावरायचें आहे.

आपण आपल्या वाट्यास आलेला उद्योग प्रामाणिकपणें करण्याचें महत्त्व ओळखलें पाहिजे. तो करीत असतां जें जीवन जगण्याचें आपल्या वाट्यास येईल. तें जीवन मंगल मानून आपण तें समाधानपूर्वक जगलें पाहिजे. इतरांचे रंगढंग पाहून आपण कां बरं विचलीत व्हावें ? विचलीत होऊन इतरांचें अनुकरण करण्याची दुर्बुद्धि आपणास कां बरं व्हावी ? त्या फाजील तृष्णेच्या जाळ्यांत आपण एकदां का अडकला म्हणजे त्यांतून तुमची सुटका होणें कठीण !

मग तुम्हीं आगीच्या डोंबांत सांपडला म्हणून खुशाल समजावें. मग संतोष असमाधान व त्यापायी भोगावी लागणारी अस्वस्थता व दुःख तुमच्यामागें लागलीं म्हणून समजावें. त्या चक्रांतून मग तुमची सुटका होणें महाकठीण आहे. मग दुःखाचा डोंगर कमी होण्याऐवजीं उत्तरोत्तर तो वाढतच जावयाचा.

अशारीतीनें माणूस जरूर नसतां दुःखांना आमंत्रण देत असतो. तीं दुःखें कमी कधींच होत नाहींत. तीं वाढतच जावयाची. आणि संपायचीं कधीं ? त्या चक्रांत सांपडलेल्या व्यक्तीच्या अंतसमयीं ! असा हा कठोर मामला आहे.

आणि मृत्यूनंतर तरी काय होत असेल ? अपुऱ्या इच्छा, आशा उराशीं बाळगून मरणारा त्याच इच्छा. आशा सांगती घेऊन जन्माला यायचा. पुन्हां तोच खेळ सुरू होतो.

याच्या उलट दुसरा प्रकार पहा. जो मनुष्य भलती हांव न बाळगतां आपल्या गरजा आटोक्यांत ठेऊन वागतो, देवानें जें दिलें आहे व जरूरीपुरतें आपण जें मिळवितों त्यांत समाधान मानून वावरतो, ज्यानें आपल्या गरजा आटोक्यांत ठेवल्या व जो संतुष्ट वृत्तींत प्रत्येक दिवस घालवितो, त्याला भगवंत आपल्या छत्राखालीं घेतो.

छत्राखालीं घेतो म्हणजे काय करतो ? त्याच्या दुःखाचा नायनाट करून टाकतो. त्याला निरागस आनंदाचा उपभोग घेऊं देतो. त्याचें जीवन सफल करतो. भगवान् त्याचा सांगाती होतो. पदोपदीं त्याच्या कृपाप्रसादाचें फळ त्याला चाखायला मिळते. माणसानें जन्माला येऊन यापेक्षां अधिक काय बरं मिळवायचें असतें ?


# गद्यरूप श्रीदासबोध सार

लेखक : डॉ. व. सी. कानविंदे

दासबोधाच्या अभ्यासकांकरितां अत्यंत उपयुक्त पुस्तक.

किंमत फक्त रु. ३–५०. ट. ख. निराळा. पृष्ठें १८२

मिळण्याचें ठिकाण:—

ग्रंथायन मराठी पुस्तक विक्रेते,

ए ११ गुडविल बिल्डिंग, माहीम–मुंबई १६

# मनात आलं कीं—

लेखक : द. शं. टिपणीस

( जून १९६७ च्या अंकावरून पुढें चालू )

( १३ ) समुद्राच्या पाण्याला जगांत तोटा नाहीं, पण तें सर्व शेतीला निरुपयोगी. शिंपले नि मोती त्याच्या पोटीं होतील, पण आत्माराम शांत करणारे मोत्याचे दाणें होणार नाहींत. खारें पाणी का कधीं कुठें सुंदर मधुर फळें वा धान्य निर्माण करूं शकेल ? देहबुद्धीला जगांत तोटा नाहीं. पण ती खारट आहे. तिच्या पोटीं निर्माण होणाऱ्या भावना विकार खारटच असणार. त्यांच्यामुळें का मानवतेचे मधुर फूल फुलणार आहे ? त्याला गोडे पाणी पाहिजे. देहबुद्धि घालवून खाऱ्याचे गोडे पाणी संत करूं शकतात. मग त्याच्या सिंचनानें हृदय बगीच्यांत आत्मज्ञानाचें कमल फुलते.

( १४ ) समुद्र तरून जाण्यास नाव लागते. संसार तरून जाण्यासही नाव लागते. समुद्रावरील नावेंत पाणी शिरले तर ती बुडेल. संसारांतील नावेंत कुबुद्धि शिरली तर ती डुबेल. म्हणून सुबुद्धीचे सुकाणूं व शुद्धचित्ताचे शीड आपल्या नावेला ( नामाला ) आहे कीं नाहीं इकडे कसोशीनें लक्ष ठेवलें पाहिजे. असें केलें तरच नाव आपल्याला संसारसागरांतून पैलतिरीं नेईल.

( १५ ) भुंगा कठीण लाकूडसुद्धां पोखरतो. पण कमळांत शिरला तर त्याच्या नाजूक पाकळ्या कुसकरतव नाहीं उलट स्वताला आंत अडकवून घेतो. ईश्वर वाईटाचा विनाश करतो, पण भक्तिरूपी कमळांत शिरला तर भक्तीच्या मधुर मधाच्या आशेनें नामाच्या पाकळ्यांत स्वतःला अडकवून घेतो. नामांत ईश्वर वास करतो.

( १६ ) प्रत्येकाच्या कुंडलीत नवग्रह आळीपाळीनें ये जा करतात. माणसाच्या मनांत सर्व वृत्तीचे तरंग आळीपाळीनं उठत असतात. पूर्वजन्मीच्या कर्मांची फळें म्हणजेच कुंडलीतील नवग्रहांची चाल. पूर्वकर्मांच्या चालू भोगाचे तरंग म्हणजेच नाना वृत्ती. अनिष्ट ग्रहांची शांति करतात. संयमाचा खडा वापरला तर वृत्तीच्या तरंगांची शांति होऊन आपली अध्यात्मिक कुंडली उत्तमांत उत्तम फळ देईल.

( १७ ) किती छान फुलबाग ही ! नाजूक गोजीरवाणी हंसरी निरनिराळ्या रंगाची

नाना तऱ्हेची फुलें हिरव्या गालीच्यावर नाचताहेत, खेळताहेत, डोलताहेत. पाहून मनीं आनंद फुलतो, पण बिचाऱ्या माळ्याला किती श्रम पडले हा आनंद फुलवायला, उत्तमोत्तम रापटी ठिकठिकाणाहून आणली व लावली. खतपाणी घातले. रोपट्यांच्या पायाला विळखा घालणारे व चांगल्याचा नाश करणारे तण वेळोवेळीं उपटून फेकून दिले, तण राहते तर आनंद कसा फुलता ? चांगल्या चांगल्या विचारांची रोपटी ठिकठिकाणाहून गोळा करून आणली, लावली व त्यांची मशागत केली व अभिमानाचे तण वेळोवेळीं उपटून फेकून दिले तर मग आपल्यालाही जीवनाची बाग आनंदानें फुलेल, हंसेल व नाचेल आणि सगळीकडे सुवास दरवळील व इतरांच्याही जीवनांत आनंद आणील नाहीं कां ?

( १८ ) फणस कापतांना चीक लागून हात खराब होऊ नये म्हणून हाताला तेल लावतात. संसार फणसांतील सुखाचे गरे काढताना मनाला नामस्मरणाचें तेल लावल्यास वासना विकार मनाला चिकटणार नाहींत. संसारांत राहूनही मन शुद्ध राहील.

( १९ ) पाऊस पडला कीं, डबक्यांतील पाण्यांत लहान मुलें कागदी होड्या सोडतात. त्या डुगडुगत हेलकावत चालू लागल्या कीं त्यांना आनंद, ब्रह्मानंद होतो, पण कागदी होडीच ती. ती काय टिकते. भिजल्यावर बुडते. पण लहान मुलांना त्यांतही आनंद वाटतो. बघ कशी बुडाली म्हणून टाळ्या वाजवतात, दुःख नाहीं करीत. डबक्यांतील कागदी होडींत त्यांचा आनंद असतो. जीव अडकलेला नसतो. असेच संत असतात. ब्रह्म पसाऱ्याच्या डबक्यांत भावनेच्या कागदी होड्या बुडवायच्याच. त्यांतला आनंद तेवढा संत टिपून घेतात, लहान मुलें व संत यांना ही जाणीव असते. नसते ती तुम्हां आम्हां मधल्या मोठ्यांना.

( २० ) गाडींत आपण बसतो. कशासाठीं ? आपले ठिकाण गांठण्यासाठीं. तींतच बसून राहण्यासाठीं नव्हे. प्रपंच करायचा, नव्हे केला पाहिजे; कारण त्यांतच आपण जन्मास आलो; पण त्यातच बसून राह्यचं नाहीं. आपले ठिकाण गाठायचें. प्रपंच हा आध्यात्मिक जीवनाच्या मार्गावरील वाहन आहे, आणि आपलें ठिकाण भगवत्प्राप्ति—आत्मज्ञान आहे.

( २१ ) अत्तराच्या आजुबाजूस सुवास दरवळतो. आपल्या अंगाकपड्यास लागलं तर त्यांनाही सुवास येतो. संत जातात तेथें सुवास आनंद दरवळतो. त्यांचा आपल्यास स्पर्श झाल्यास कृपा झाल्यास आपणही त्यांच्याप्रमाणें सुवासिक होतो. यास्तव संतांनीं आपल्याला स्पर्श करावा म्हणून आपण नित्य खटपटींत असावे.

(२२) दोन लाकडे सफाईदार जोडण्यास प्रत्येकास थोडे थोडे तासावे लागते. दोघांचे सख्य होण्यास प्रत्येकानें थोडी थोडी घास सोसणें जरूर आहे. देवाण घेवाण केली पाहिजे. दुसऱ्यासाठीं थोडी घास सोसली पाहिजे. त्याखेरीज समाज जगणार नाहीं कीं मानवता निर्माण होणार नाहीं.

(२३) डॉक्टर रोगाचें मूळ शोधून काढून तें नाहींसें करतो म्हणून रोग बरा होतो. नुसतें असें आहे नि तसें आहे अशी मिमांसा करीत बसत नाहीं. समाजाचें व राष्ट्राचे नुसते दोष दाखविल्यानें समाज वा राष्ट्र सुधारणार कीं त्या दोषांचीं मुळें हुडकून ती नाहींशी केल्यानें सुधारणार ? अधोगतीस अहंकार हा मुख्य कारण आहे. तो नाहींसा करण्याचा विचार व तदनुसार प्रयत्न केल्यानेच मानवी उन्नति होईल. नुसती व्याख्यानें व प्रवचने काय कामाची ? भुकेल्या माणसाला आहारशास्त्रापेक्षां भाकरीचा चतकोर अधिक फायदेशीर आहे.

(२४) डोंगरमाथ्यावर जाणारा रस्ता सरळ नसतो. त्याला चढ सपाटी व उतार असतात. अध्यात्मिक प्रगतीचा आलेख सरळ नसतो. कधीं प्रगति तर कधीं स्थिरता तर कधीं परागति होत आहे असें वाटतें. कधीं प्रकाश तर कधीं अंधार भासतो. भक्तानें न डगमगता निष्ठेनें मार्ग क्रमित राहवें. तो पर्वत माथ्यावर पोहोंचेल व त्याला सूर्योदय दिसेल. गाडी नाहीं कां पुढें जाण्यासाठीं थोडीं मागे जात ? गोलंदाज नाहीं कां चेंडू टाकण्यापूर्वीं कांहीं पावले मागे जात ? अज्ञान्याला मात्र वाटतें कीं, खेळ सोडून चालला तो. त्यानें सबुरी राखली तर त्याला सर्व कळून येईल.



# अमृत-कलश

**लेखक : केशव कृष्ण प्रधान**

अखिल विश्वाच्या मांगल्यांत भर घालण्यासाठीं, मानवजातीच्या जास्तींत जास्त कल्याणासाठीं, पृथ्वीतलावर थेट परमेश्वरापासून ते सर्वसाधारण समाजकर्त्यां-पर्यंत निरनिराळ्या विभूति तहत विश्वाच्या सुरवातीपासून आजतागायत अहर्निश प्रयत्न करीत आहेत व पुढेंही करीत रहातील; परंतु या त्यांच्या सर्व श्रमाचा व मेहनतीचा जर का आपण आढावा घेतला तर पुष्कळ वेळा आपल्या मनाला असें वाटतें कीं, सर्वसाधारण जगांतील मानवजात सुखाकडे तर राहोच, पण दुःखाकडे मात्र जास्त-जास्त वाटचाल करीत आहे. हें सर्व पाहून आपल्या मनाला सखेद आश्चर्य वाटणें सहाजिकच आहे. हें असें कां होते याचा या लेखांत आपण जरा सांगोपांग विचार करूं या.

अखिल मानवजातीच्या कल्याणाचा विचार करतांना प्रथम ठळकपणानें आपल्यासमोर जो कांहीं विचार निर्माण होतो तो असा कीं, मानवी जीवनांत जगण्या-साठीं चाललेली धडपड प्रत्येक मानवाला जोपर्यंत आपण जिवंत आहोंत तोपर्यंत आपल्या किमान उदर-निर्वाहापुरत्या जरुरी पुऱ्या व्हाव्या असे वाटणारच. ही त्याची प्रथम गरज पुरी झाल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही बाबीचा किंवा त्याहून उच्च विचाराचा त्याला साधासुधा विचारही करावयास लावणे हे एकप्रकारचे पाप आहे. भगवान येशू खिस्ताने एका धर्मगुरूला धर्मोपदेश करण्यापेक्षां भुकेल्याला अन्न, उघड्या-नागड्यांना वस्त्र व निराश्रितांना आसरा प्रथम देण्याचा जो संदेश दिला त्याचें मर्म हेंच आहे. त्या धर्मोपदेशकाची निर्भत्सना करतांना भगवान येशूखिस्त म्हणाले, 'Give them food; clothe & shelter & not stones' येथें stone ह्या शब्दाचा अर्थ धर्माचा उपदेश हा आहे. प्रत्येक मानवाचें जीवन व त्यांतील धडपड बहुअंशी अन्न, वस्त्र व आसरा हीच मिळविण्याकडे व्यतीत होते. व ती प्रथम गरज पूर्णपणें पुरी होण्यापूर्वीच त्याचें जीवन संपुष्टांत येते. तेव्हां या बाबीपलिकडे त्यास दुसरे उच्च विचार करण्यास सवड तरी

कशी भिळणार ? असे आपल्याला सकृतदर्शनीं वाटणें अगदीं सहाजिक आहे. मानवाची ही प्रथम गरज पुरी करण्याकरितां सर्व जगाभर्ध्यें झालेल्या निरानिराळ्या प्रयत्नांचा इतिहास म्हणजेच जगाचा इतिहास आपण समजतो. या प्राथमिक गरजांचे निवारण करून मानवजात सुखी करण्याचा प्रयत्न एक अत्यंत व्यवहार्थ प्रयत्न आहे म्हणून आर्थिक, राजकीय, आंतर राजकीय प्रांतांत फार मोठे मोठे श्रेष्ठ पुरुष निर्माण झाले. अर्थशास्त्र, राजशास्त्र, आंतर राष्ट्रीय-संबंध सुधारणा शास्त्र अशा सर्व शास्त्रांनी मानवाच्या निव्वळ प्राथमिक गरजा पुऱ्या करण्याकरिता केलेल्या धडपडीतून आजचे जग निर्माण झाले आहे. त्या जगाला सुखसोयींनी समृद्ध करण्यासाठीं व मानवाला वाटणाऱ्या रोजच्या प्राथमिक गरजांच्या विवंचनांतून त्याला कायम मुक्त करण्याकरितां विज्ञानशास्त्राने महान शोध लावून Where there was deficit now there is surfeit ही स्थिती आणण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला आहे. तरी देखील सर्व जगभर आपणास औदासिन्य, चिंता, काळजी, भीति हेच वातावरण पसरले आहे असें दिसते. याचें कारण काय असावे असा प्रश्न साहजिकच आपल्या मनांत उभा रहातो.

हल्लींचें जग हें भांडवलशाही व समाजवादी राष्ट्रें ह्यांत विभागलें गेलेलें आहे. भांडवलशाही तत्त्वावर चालणाऱ्या कांहीं देशात इतकी समृद्धी आहे तरी देखील अतृप्त मानवाला तीहि अपुरी वाटू लागली आहे व त्यामुळे तेथील मानव आपली सुख आणि मनःशांति हरवून बसला आहे, तर कांही समाजवादी देशांत इतकी दरिद्री अवस्था आहे की; उद्याचे आपले कसे निभावेल या विवंचनेत मानव अहर्निश होरपळून निघत आहे. मोठमोठे श्रेष्ठ गणलेले राजनीतिकुशल पंडित, अर्थशास्त्रज्ञ या दोन स्थितीतील सुवर्णमध्य शोधून काढण्याच्या खटपटीत आहेत. आपण क्षणभर असे धरून चालू कीं उद्याच्या जगांत हा सुवर्णमध्य सांपडून त्याप्रमाणें भांडवलशाही व समाजवाद ह्यामधील एक दिव्य शास्त्र निर्माण झाले तरी मानव सुखी होईल का ? हा प्रश्न शिल्लकच राहील, कारण फार तर माणसाच्या प्रथम गरजा त्यामुळें भागल्या जातील.

परंतु मानवाची घडणच अशी विचित्र आहे कीं, तो शरीर, मन आणि बुद्धी या तीन अविभाज्य स्वरुपात जन्माला येतो व त्यामुळें त्याच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक अशा तीन तऱ्हेच्या गरजांची त्याच्या ठिकाणी इतकी जलद हालचाल होत असते की, त्याच्या नुसत्या अन्न, वस्त्र व निवारा ह्या शारीरिक गरजा पुऱ्या झाल्या तरी तो सुखी होऊं शकत नाहीं. या तिन्ही तऱ्हेच्या भिन्न-अविभिन्न गरजामधून तो कसल्यातरी दिव्य सुखाचा सतत शोध करीत असतो. परंतु त्याला तो

शोधीत असलेले ते दिव्य सुख शारीरिक आहे कीं मानसिक आहे की, बौद्धिक आहे, असे विचारल्यास तो त्याचे उत्तर बरोबर देऊं शकत नाही. यावरून एकच निष्कर्ष निघतो की, मानवाची ह्या दिव्य सुखाची भूक एकाच वेळेला जर पुरी करावयाची असेल तर त्याला शरीर, मन, बुद्धी या त्रयीला एकदम देणारे असें कांहींतरी सुख शोधून काढले पाहिजे व त्या शोधासाठीं सर्व शास्त्राना एकसमावेच्छेद करून राबवली पाहिजेत. हल्लीच्या जगाकडे आपण लक्ष टाकल्यास आपणास असे दिसून येईल कीं, युगे–युगे चाललेल्या या जगांत सर्व शास्त्रांच्या उत्क्रांतीत एक करतां एक होत आहे. आंतर–राष्ट्रीय अर्थ–शास्त्र मानवाची आर्थिक समता प्रस्थापित करण्याऐवजी आर्थिक विषमता निर्माण करीत आहे. आंतर–राष्ट्रीय राजनीति शास्त्र जगात शांति निर्माण करण्याऐवजी कलह आणि भांडणेच लावीत आहेत. विज्ञानशास्त्र मानवी सुखासाठीं लावित असलेल्या शोधांचा उपयोग मानवाच्या विध्वंसाकडे होत आहे. थोडक्यांत ह्या सर्व शास्त्रानी आपले ध्येय मानवाला शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक अशा तिन्ही सुखातून निघणाऱ्या एकाद्या अतिंद्रीय सुखाबद्दलच ठेवावें व त्या दृष्टीनेंच यापुढें त्या शास्त्रांची उत्क्रांति करावी असें मला वाटते.

फार पुरातन काळापासून अखिल मानवजातीच्या कल्याणार्थ दोन तऱ्हेच्या शास्त्रांचा उदय झालेला आहे. स्थूलतः त्यांचे दोन भाग पडताल. [ ( १ ) देश, काल, परिस्थिती यांच्यात जरी कितीही बदल झाला तरी मानवकल्याणाचीं अबादीत तत्त्वे प्रतिपादन करणारी शास्त्रें ( २ ) मानवी जीवनाच्या व्यवहारोपयोगी परिस्थितीनुसार उत्क्रान्त होत असलेली निरनिराळ्या प्रांतातील शास्त्रें जोपर्यंत या दुसऱ्या प्रकारच्या शास्त्राचे एकमेव ध्येय प्रथम क्रमांकात दाखविलेल्या शास्त्रांतील सिद्धांताकडे वळणार नाहींत तोपर्यंत अखिल मानवजात सुखी करण्याचा प्रयत्न मानवाचे एक निव्वळ स्वप्नच ठरणार आहे.

थोडक्यांत मानवी सुख हे एक चिरंतन, अमर असे दिव्य सुख आहे व त्याचा उगम आणि सांठा ही दोन्ही मानवी अंतःकरणांत शरीर, मन आणि बुद्धी या तिन्हींच्या मागे असून मानवाला ह्या सुखाचा अनुभव आल्यास एकाच वेळेला मानवाचे हे तीन अविभाज्य भाग सुखावतात, मोहरतात, पालवतात व त्याच व सुखाचा शोध अहर्निश मानव त्याच्या वैयक्तिक, व्यवहारिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीत करीत असतो. हे तत्त्व आज इतके ठळकपणे आपल्या नजरेसमोर येत चालले आहे तितके ते पूर्वी कधीच नव्हते असे म्हटले तरी चालेल.

मानवाच्या या सुखाचा शोध लावण्यासाठी पृथ्वीतलावर निरनिराळे धर्म स्थापित झाले, परंतु त्याचा परिणाम मानवाची विभागणी त्याच्या धर्मात होऊन च धर्म मानवाच्या कलहाला मात्र कारणीभूत झाले. त्याला जगाच्या इतिहासाची साक्ष आहे. या धार्मिक कोलाहलामध्यें विश्वबंधुत्व, परमेश्वराचे एकत्व वगैरे सर्व उदात्त तत्वांचा जगाला केवळ विसर पडला नाहीं तर ते शब्द वारंवार पोकळपणे उच्चारल्यामुळें जग त्याचा तिरस्कार करूं लागले. त्याचा परिणाम बहुतेक मानवजात भौतिकवादी प्राण्याच्या मार्गावर लागले व परिस्थितीप्रमाणें उत्क्रांत होणारी अशाश्वत तत्वे प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रांच्या मार्गे हीच शास्त्रे आपल्याला कायम सुख देतील या भ्रमानें लागली व त्याचा परिणाम आज आपल्याला सर्व जगामध्यें दंगे, धोके, कलह, अनीति, लढाया यात झालेला दिसत आहे.

या सर्व विवेचनावरून आपल्या लक्षांत येईल की, अखिल मानवजातीच्या कल्याणासाठीं जगातील प्रत्येक मानवाला शरीर, मन आणि बुद्धी या त्रयीला सुखणारे एक अतिंद्रीय असे सुख त्यास मिळून दिल्यादिवाय दुसरं गत्यंतर नाहीं व त्यासाठीं फक्त एकच मार्ग जो आतांपर्यंत जगाने चोखळण्याचा प्रयत्न केला तो म्हणजे जगातील सर्व संतांनीं सांगितलेला अतिंद्रिय सुखाचा मार्ग हाच होय. कोणत्याही एका देशाकरितां किंवा राष्ट्राकरितां नव्हे तर अखिल मानवांच्यासाठीं सर्व भेदाभेद विसरून अशा तऱ्हेचा दिव्य संदेश त्यांना देता येईल का की तो शाब्दिक नसून त्यांच्या अनुभवांत तो पुरा–पुरा उतरेल हाच सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे व त्यासाठीं अशा तऱ्हेचा दुर्मिळ अनुभव घेतलेल्या महात्म्यांची आज जगाला जरूर आहे. थोडक्यांत म्हणजे ' आपणा सारिखे करीती तात्काळ । नाहीं काळ वेळ जया लागीं ' या उक्तीत वर्णन केलेल्या उत्क्रांत मानवांना आवाहन देऊन पृथ्वीतलावर त्यांना निरनिराळ्या भागांत पाठवून त्यांच्याकडून हे दिव्य, महान्, मंगलमय कार्य करून घेतले पाहिजे हा एकच जग सुखी करण्याचा उपाय आहे असे आपणास दिसून येईल.

या वरील परंपरेत आपला भारत देश फार पुरातन काळापासून फार श्रेष्ठ म्हणून गणाला गेला आहे. त्याचें कारण अशा तऱ्हेचे उत्क्रांत मानव भारतांत सर्व जगापेक्षां जास्त प्रमाणांत उपलब्ध असावेत असा अंदाज आहे. त्यांची स्थिती व कार्य खालील अभंगात वर्णन केल्याप्रमाणें असते.

अमृत कलश घेऊनियां हातीं
शिंपडावा जगतीं ऐसें वाटे ।

रोमरोमीं जनांच्या ओतावे हे सुख
घालवावें दुःख सीमापार ।

हाचि अट्टाहास हाचि हा उपाय
मोहरावी काया याचि ध्येयी ।

परंतु मानव जातीमध्ये या अतिंद्रिय सुखासाठी तीव्र इच्छा निर्माण मात्र झाली पाहिजे. नुसते उत्क्रांत मानव असून काय उपयोग ?


## "साई भक्तांस अमूल्य संधी"

श्री साईलीला १९५८ (त्रैमासिक) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ (मासिक) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक (विशेष अंकासह) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, (विशेष अंकासह) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. (एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे,) (दोन अंकास १५ पैसे,) (तीन अंकास २० पैसे,) (चार अंकास २५ पैसे.) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह (स्टँप–तिकिट) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

पुढील वर्षी साजरी होणारी —

# सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथि

**************************

श्री साईबाबांच्या भक्तांच्याच नव्हे तर सर्व जनतेच्या दृष्टीनें पुढील वर्ष (१९६८) फार महत्त्वाचें व संस्मरणीय होऊन रहाणारें आहे. साईबाबा १९१८ सालीं विजयादशमीच्या दिवशीं ( ता. १५ ऑक्टोबर १९१८ ) समाधिस्थ झाले. अर्थात् पुढील वर्षी बाबांची पन्नासावी पुण्यतिथि येत आहे, आणि ते वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून मोठ्या समारोहपूर्वक पालन करण्यांत यावयाचें आहे.

हा सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी–महोत्सव सतत सप्ताहभर, विविध कार्यक्रमांच्या रूपानें साजरा करण्यांत येणार आहे. हे कार्यक्रम आंखून ते यथास्थितपणें पार पाडण्यासाठीं एक जबाबदार समिती महाराष्ट्र–सरकारचे अर्थ नि कायदामंत्री ना. बॅ. एस. के. वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें समारंभाची व्यवस्था, निरनिराळे कार्यक्रम, निधि जमविणें, वगैरे कामें सुकर रीतीनें पार पडावी यासाठी पोटसमित्याही नेमण्यांत आल्या आहेत.

एकंदर कार्यक्रमांची स्थूल मानानें पुढें थोडक्यांत कल्पना करून देण्यांत येत आहे. विस्तृत व सविस्तर कार्यक्रम जसजसे मुक्रर होतील तसतसे ते प्रसिद्ध करण्यांत येतील.

सर्व कार्यक्रम एका सप्ताहांत बसविण्यांत येत आहेत. त्या सात दिवसांत नेहमींप्रमाणें भजन, पूजन, प्रवचन, कीर्तन, अभिषेक, पारायणें वगैरे नैमित्तिक कार्यक्रम होतीलच. रोज धार्मिक नि अध्यात्मिक विषयांवरील विद्वानांची व शास्त्रीपंडितांची व्याख्यानें–प्रवचनें होतील. थोडक्यांत सांगायचें म्हणजे तो सप्ताहभर शिर्डीत ज्ञानसत्र उघडण्यांत आलेलें असेल.

या सप्ताहांत जवळून व दूरदूरच्या भागांतून लक्षावधि भक्तमंडळी शिरडींत येतील. त्यांच्या रहाण्याउतरण्याची, चहापाण्याची, भोजनाची, स्नानाची, पूजाअर्चेची, आरोग्याची वगैरे व्यवस्थित सोय लावणें हा प्रश्न फार महत्त्वाचा तितकाच तो जिकिरीचाही आहे. परंतु तो यशस्वी रीतीनें सोडविणें जरूर आहे. त्यासाठीं एक खास वजनदार समिती नेमण्यांत आली आहे.

या सुवर्णमहोत्सवानिमित्त श्री साईबाबांचे पोष्टाचे स्टॅम्प्स काढण्यांत यावेत अशी भारत सरकारला विनंती करण्यांत आली आहे.

या उत्सव कमिटीनें सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथिनिमित्त जे विविध निर्णय घेतले आहेत त्या सर्वांत महत्त्वाचा म्हटला म्हणजे ' साईबाबा फाऊंडेशन'संबंधींचा होय. त्यामुळें बाबांची स्मृति अत्यंत संस्मरणीय रीतीनें कायम रहाणार आहे.

ह्या फाऊंडेशनपुढें फार महत्त्वाचे उद्देश आहेत. त्यापैकीं प्रमुख म्हणजे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक व उच्च शिक्षणाची सोय करणें व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणें; एक मोठें ग्रंथसंग्रहालय स्थापन करून त्यांत शास्त्रीय, धार्मिक, अध्यात्मिक ग्रंथ ठेवणें व वाचकांस ते सहज रीतीनें उपलब्ध करून देणें.

धार्मिक तत्त्वज्ञानविषयक नि अध्यात्मिक असें एक अभ्यासमंडळ स्थापन करणें; ज्या विद्यार्थ्यांना त्या विषयांचा अभ्यास नि तत्संबंधी संशोधन करायचें आहे, त्यांचा मार्ग मोकळा करून त्यांचें मार्गदर्शन करणें.

ह्या फाऊंडेशनसाठीं फार मोठ्या प्रमाणांत निधि जमा करण्यांत यावयाचा आहे. ह्या कार्यासाठीं शक्यतों संस्थानचा निधि उपयोगांत न आणता तो स्वतंत्र रीतीनें उभारण्यांत यावयाचा आहे. तसेंच त्यासाठीं स्वतंत्र घटना तयार करण्यांत यावयाची आहे.

या स्वतंत्र निधीसाठीं देणगीदारांस, धनिकांस व दात्यांस उद्देशून विनंतीपत्रक काढण्यांत येईल. देशभर व देशाबाहेर जे साई समाज किंवा केंद्रें आहेत त्यांनीही या कार्यांत शक्यतो सहकार द्यावा.

या बाबतींत सर्वांनीं कटाक्षपूर्वक लक्षांत बाळगण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट आहे. कोणाही व्यक्तीला किंवा संस्थेला साईबाबांच्या नांवें देणग्या मिळविण्याचा अधिकार देण्यांत आलेला नाहीं. कोणाही भक्ताला, व्यक्तीला किंवा दात्याला साईबाबांच्या नांवें देणगी द्यावयांची असेल ती त्यांनीं, रिसीव्हर श्री साईबाबा संस्थान, शिर्डी या पत्त्यावर पाठवावी किंवा कमिटीच्या नांवें पाठवावी अशी विनंती आहे. ही सूचना प्रत्येकानें कृपया लक्षांत बाळगावी.

दुसरी एक महत्त्वाची सूचना करण्यांत येत आहे आणि ती सोव्हेनीरसंबंधीं. कमिटीतर्फें एक सोव्हेनीर प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. असें समजतें कीं, पैशांच्या लोभानें कोणी ना कोणीं ( कमिटीशीं संबंध नसलेले ) साईबाबांच्या नांवें 'सोव्हेनीर' काढण्याच्या विचारांत आहेत. तरी अशा लोकांपासून जनतेनें सावध रहावें अशी विनंती आहे. अनधिकृत लोकांच्या जाळ्यांत सांपडून कोणीही फसूं नये.

# संत विनोबा यांची बोधवचनें

सद्गुण स्वभावतःच वाहते असतात. सांचलेले सद्गुण दुर्गुणांच्या योग्यतेला [illegible]तात.

हिंसेनें राज्य मिळेल, पण स्वराज्य मिळणार नाहीं. स्वराज्य म्हणजेच अहिंसा.

जातिधर्म, कुलधर्म, राष्ट्रधर्म इत्यादि विहित आहेत. जात्यभिमान, कुलाभिमान, [illegible]ाभिमान इत्यादि निषिद्ध.

आत्मत्रयी : पापात्मा, पुण्यात्मा, परमात्मा.

प्राप्त कर्म सोडून आवडते निवडण्यांत अस्वाद-व्रताचा भंग होतो.

जेथें शक्ति तुटून पडते त्या शक्तीच्या शेवटच्या टोंकाला परमार्थांत 'यथाशक्ति' [illegible]णतात.

( १ ) स्वरूप सोडूं नको. ( २ ) सिद्धान्त सोडूं नको. निदान ( ३ ) मर्यादा [illegible]डूं नको.

प्रत्याहार तिहेरी : ( १ ) इंद्रियें चिंतनार्थ आवरून घ्यावीं. ( २ ) भजनार्थ मोकळी [illegible]डावीं ( ३ ) जीवनार्थ संयमानें वापरावी.

भक्ति चार प्रकारची — १ परा २ एका ३ प्रिया ४ पूज्या.

जें अद्वैत नित्यकर्महि सहन करीत नाहीं तेंच निषिद्धहि गिळण्यास तयार होतें.

वैदिक शब्द सूक्ष्म अर्थाचे आहेत. त्यांपासून पुढें स्थूल लौकिक अर्थ निघाले. [illegible]क्ष्मांतून स्थूल, अव्यक्तांतून व्यक्त हा सृष्टि-नियम आहे.

कृष्ण स्वतःला सामान्य गवळ्यासारखा मानीत होता एवढेंच नव्हे, तर लोकहि [illegible]ाला तसाच मानीत होते आणि मानतात. ह्या दुसऱ्या गोष्टींत कृष्णाच्या अमानि-[illegible]ाची विशिष्टता आहे.

देह-बुद्धि सोड. व्यापन-बुद्धि सोड. रचना-बुद्धि सोड.

शेतांतले वरवरचें पीक शेतकऱ्याचें, पण जमिनीच्या आंतल्या धनावर सर्वांची [illegible]त्ता. तसें सामान्य विचारावर त्यांच्या मातृभूमीची मालकी, पण असामान्य विचार सर्व जगाच्या मालकीचे.

जगांत दोन महिमे काम करीत आहेत. ( १ ) सत्य—महिमा आणि ( २ ) ना
महिमा.

जगांत नीति आणि भक्ति नांदावी हा धर्माचा उद्देश आहे.

वेद–प्रामाण्य म्हणजे पूर्वपरंपरेविषयी कृतज्ञताबुद्धि आणि नवीन पराक्रमा
स्फूर्तियुक्त मोकळीक.

कृष्णानें गाय वांचविली. बुद्धानें बकरी वांचविण्याचा प्रयत्न केला.

'यथेच्छसि तथा कुरु' असें सांगून पुनः 'मामेकं शरणं व्रज' आ
स्वतंत्रतेनें संयमाला वरावें ह्यांत स्वारस्य आहे.

कर्मांत अकर्म हें ज्ञानाचें सगुण लक्षण आहे. अकर्मांत कर्म हें ज्ञानाचें नि
लक्षण आहे.

वाद चार आहेत—१ दंभवाद, २ अज्ञानवाद, ३ भावार्थवाद, ४ यथार्थ

मरतांना घोंगडीवर निजवतात. जीवनांत गरिबी नसली तर निदान मरत
ती असूं दे.

साम्राज्यवाद म्हणजे संपत्ति, सत्ता आाण संस्कृति ह्यांची आसक्ति.

'भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास'—

कोणत्याहि प्रश्नाला एक देह असतो आणि एक आत्मा. भक्त देहावि
स्वाभाविकच उदासीन असतो.

सद्–गुरु : ज्यांचें 'अस्तित्व' श्रद्धेय आहे. चिद्–गुरु : ज्यांचें 'ज्ञान' पर
मंडळांत जाणवतें. जगद्–गुरु : ज्यांचें 'कार्य' सर्वांना प्रकट आहे.

ईश्वराची पैतृक सत्ता स्वीकारल्याशिवाय जगांत भ्रातृभाव नांदणार नाहीं.

संत सूर्यासारखा शेतें पिकवील. सुधारक अग्नीसारखा भात शिजवील.

गोपींना प्रेममूर्ति, द्रौपदीला कारुण्यमूर्ति, अर्जुनाला ज्ञानमूर्ति, व्या.
क्षमामूर्ति.

उपासना तीन प्रकारची—१ आत्मपरीक्षणपर—गंभीर २ हरिदर्शनपर
आनंदमयी ३ तत्त्वचिंतनपर—शांत.

उन्मनी—आध्यात्मिक–झोप. प्रबुद्ध—आध्यात्मिक जागृति. दोन्ही एकमेकीं
पडताळ्याच्या अवस्था आहेत.

सामर्थ्य आहे सत्यनिष्ठेचें । असेल जयापाशीं तयाचें । ह्यांचें चि
'भगवंताचें । अधिष्ठान' ॥

ऋषींचें दर्शन, तत्त्ववेत्त्यांचें ज्ञान, संतांचा अनुभव.

"तुम्ही रज्जुसर्पाप्रमाणें 'विवर्त' मानता कीं सुवर्णकंकणाप्रमाणें परिणाम ानता ?"

"मी सुवर्णकंकणाप्रमाणें 'विवर्त' मानतों."

'बुद्धि' प्रामाण्य हवें, 'अहं' प्रामाण्य नको.

स्नान करतांना 'सहस्रशीर्ष' म्हणण्याचा संप्रदाय आहे. त्यावेळीं हजारों बिंदूंच्या रूपांत सहस्रशीर्ष परमात्मा हजारों हातांनीं मला स्पर्श करीत आहे अशी ावना करावी, म्हणजे जीवभाव धुऊन निघेल.

पिपीलिका उत्तम गुरु, विहंगम उत्तम शिष्य.

(१) एकाग्र अद्वैत जें एकसाधननिष्ठ असल्यामुळें अन्य साधन कल्पूं त नाहीं.

(२) समंजस अद्वैत जें एकसाधननिष्ठ असून अन्य साधनांना मान्यता देतें.

(३) सारग्राही अद्वैत जें साधनसमुच्चयनिष्ठ असतें.

(४) आत्यंतिक अद्वैत जें साधनमात्रांत अभेद अनुभवतें.

जीवन हें विचार, अनुभव आणि श्रद्धा ह्यांचें घनफळ आहे.

संत गाईसारखे वत्सल आहेत, म्हणून स्वतः तत्त्वज्ञानाचा कडबा पचवून गाला भक्तिनीतीचें दूध पाजीत असतात.

उत्साह-वृद्धि, विकार-शमन आणि ज्ञान-परिपोष ही स्वच्छ निद्रेची तीन क्षणें आहेत.

अंकुर केव्हां फुटावा हें पेरणाराच्या हातापेक्षां गव्हाला अधिक समजतें. ळाची चिंता कर्त्यानें करूं नये. ती करण्यास कर्म समर्थ आहे.

शिष्टता—अनुकरणीय, विशिष्टता—चिंतनीय, अशिष्टता—परिहार्य.

वेद स्वभावानें बोलतात, गुरु उपदेशार्थ बोलतात, मी जपार्थ बोलतों.

नेहमीं अपयश येतें ह्यांत आश्चर्य नाहीं. यश म्हणजे समाप्ति. ती नेहमीं कशी ईल ? ती एकदाच यावयाची.

साम्यें अनेक आहेत. पण त्या सर्वांत ब्रह्म-साम्य अन्तिम आणि श्रेष्ठ आहे.

प्रल्हादानें नवविधा भक्ति सांगितली आहे. पण भक्ति नवविधा म्हणजे नकच

प्रकारची असली पाहिजे, असा कायदा नाहीं. नवविधा म्हणजे अनेक प्रकारची नवीन उमाळ्यांनीं प्रकट होणारी, असा भाव मी घेतों.

'पश्यति' शिवाय ज्याला विश्वास पटत नाहीं तो 'पशु'. 'मनुते'वर ज्याचें काम भागतें तो 'मनुष्य'.

अनुभविकाचा अनुभव-तो प्रामाणिक असेल तर-प्रमाण मानला पाहिजे, पण म्हणून अनुभविकाचा निष्कर्ष प्रमाण मानला पाहिजे, असें होत नाहीं.

खरें साधन एकच-तळमळ.

खरी सिद्धि एकच-शांति.

साधक अग्नीसारखा असावा-विवेक ज्याचा प्रकाश, वैराग्य उष्णता.

परा-नेति, पश्यन्ती-ॐ, मध्यमा-राम, वैखरी सत्य.

मनांत सांचलेली अडगळ साफ करून मन मोकळें करणें हें अपरिग्रहाचें कार्य आहे.

ब्रह्म केवळ 'नेति' नाहीं. ब्रह्म 'नेति नेति' आहे. जें सगुणहि नाहीं आणि निर्गुणहि नाहीं तें खरें निर्गुण.

वेदामध्यें 'सहते' ह्या धातूचे दोन अर्थ आहेत : (१) सहन करणें आणि (२) जिंकणें. जो सहन करतो तोच जिंकतो.

नम्रता म्हणजे लवचिकपणा. लवचिकपणांत तणावाची शक्ति आहे, जिंकण्याची कला आहे आणि शौर्याची पराकाष्ठा आहे.

ज्ञानाच्या चार भूमिका : १ ज्ञान, २ व्यवसाय, ३ समाधि, ४ प्रज्ञा.

यज्ञानें मुख्यतः दैविक (म्ह. प्राकृतिक) शक्तींचा तोल राहतो. दानानें सामाजिक, आणि तपानें मानसिक शक्तींचा तोल राहतो.

देवी उषे! तूं सात्त्विकता मूर्ति आहेस. रजोगुणी दिवस आणि तमोगुणी रात्र ह्यांच्या कैचींत सांपडलेल्या मनाची सुटका तुझ्याशिवाय कोण करणार?

यशानें नम्रता आणि अयशानें उत्साह हा यश आणि अयश ह्यांचा कर्मयोगांतील विनियोग आहे.

'प्रियं ब्रह्म'—ईश्वर प्रेममय आहे. असें श्रुतीचें वचन आहे. भक्तिमार्गाचा बीजमंत्र हाच.

वेदामध्यें ईश्वराला ' सुरूप-कृत्नु ' म्हटलें आहे. सुंदर सृष्टि निर्मिणारा स्वतः किती सुंदर असेल!

अल्प श्रद्धेच्या माणसाला लोक परमार्थ पचनीं पडूं देत नाहींत, हा लोकांचा उपकार आहे.

साधकाच्या साधनेंत अशी एक अवस्था येते कीं, ज्यावेळीं त्याला पुढें विचार करण्याला कांहींतरी आलंबन लागतें. त्याशिवाय धीर खचतो, निश्चय डळमळूं लागतो, बुद्धि साशंक होते. ही कसोटीची वेळ आहे.

सर्व दानांमध्यें अभय-दान श्रेष्ठ आहे. आणि तें देण्याचें सामर्थ्य मुक्ताशिवाय म्हणजेच ईश्वराशिवाय कोणाला नाहीं.

स्वप्नजय दोन प्रकारचा-१ सुस्वप्नता. २ निःस्वप्नता. सुषुप्तजय म्हणजे सुषुप्तींत विचारांचा नित्य-विकास.

उन्मनींत सृष्टीची ओळख नाहीं. सहजस्थितींत ओळख असून ओळख नाहीं. उन्मनी कालपरिच्छिन्न आहे. सहजस्थिति नित्य आहे.

निंदास्तुतींची वजाबाकी करणारा मनुष्य आपोआप मोकळा होतो.



# स्त्रीसंत आईसाहेब पळसे, रा. नासिक

## लेखक : ना. त्र्यं. जवारकर, धुळें

शके १७०० सेचे आरंभास आईसाहेब पळसे यांचा जन्म कात्रज माडवण येथें झाला. देशमुख घराणें होतें. त्यांचे आठव्या नवव्या वर्षी त्यांचे लग्न करण्याचें ठरविलें. पण ज्याप्रमाणें श्रीसमर्थ रामदासस्वामी विरक्त होते त्याप्रमाणें आईसाहेब विरक्त असल्यानें एके रात्रीं कोणास न विचारतां घराबाहेर पडल्या. वाटेनें यात्रेकरू भेटले त्यांच्याबरोबर पंढरपूर येथें पोहोंचल्या. तेथें वाळवटांत कीर्तन चालू होते त्या भजनांत विठोबा बाळरूपानें टाळ वाजवीत नाचत आहे असे प्रत्यक्ष देवाचें दर्शन झाले. तेथेंच त्यांची समाधी लागली. भजन संपल्यावर सर्वजण निघून गेले. देहभानावर आल्यावर मंदिरांत गेल्या. कांहीं दिवसांनीं चंद्रभागेंत स्नान करीत असतां हातांत पांडुरंग मूर्ती येईल ती घेऊन तूं सद्गुरुकडे जा. ती मूर्ती घेऊन नाशकापासून पूर्वेस चार कोसांवर असलेल्या पळसे गांवी गेल्या. सद्गुरूस अंतरज्ञानानें हे सर्व समजले होते. सद्गुरुची भेट व ओळख झाल्यावर आईसाहेबास अतिशय आनंद झाला. दुसरे दिवशीं पळसे गांवी जाणेस निघाल्या तों ती मूर्ती इतकी जड झाली कीं जागची हालेना. सद्गुरुनीं मूर्तीचे मनांत तेथेंच वास्तव्य करणेचे आहे. एकानें घरचा कांहीं भाग मंदिरासाठीं दिला. तेथें मंदीर बांधून मूर्तीची स्थापना केली. लोक भक्तीमार्गास लावले. एके दिवशी शके सोळाशें एकसष्ठ माघ शु॥ द्वितीया होती. सद्गुरूनीं व आईसाहेबांनीं एकेच दिवशीं देह विसर्जन केले. पळसे गांवचे मंदिराचे आवारांत दोघांच्या समाध्या आहेत. भक्तिभावाप्रमाणें त्यांचे प्रत्यक्ष दर्शन होते असें अनुभवी लोक सांगतात.

# सुविचार — संग्रह

********************

**— संत विनोबा**

देहधारी पुरुषानें आपली सर्व प्रेमशक्ति एकवटून केलेल्या संपूर्ण सेवेचें अंतिम फलित 'अ-हिंसा' ह्या निषेधक शब्दानें व्यक्त होते.

जर ईश्वराला दुसऱ्या एखाद्या वस्तूची उपमा देता आली तर ती वस्तु ईश्वर कां होणार नाहीं ? कारागिराला चित्राची उपमा कशी देता येईल ?

कोंबड्याचा आवाज ( १ ) तीव्र, ( २ ) मृदु, ( ३ क्रमिक आणि ( ४ ) अनुकंपित असतो. जागविणाराची वृत्ती अशीच हवी.

आपण 'बिघडून' दुसऱ्यांना बिघडवणें हा संतांचा स्वभावच आहे. त्यांतून तरुणांना बिघडवणें हें तर त्यांचें अवतारकार्य आहे.

भुक्ति आणि मुक्ति एकाच काठीचीं दोन टोकें आहेत.

सर्वच प्रश्न सोडवून सुटणारे नसतात. कांहीं प्रश्न सोडून दिले कीं सुटतात.

जोंपर्यंत डोळ्यांत अद्वैत बिंबलें नाहीं तोंपर्यंत सौंदर्याच्या कसोटीवर विश्वसून चालणार नाहीं.

आरुरुक्षु जीवनांत –(१) उद्योग, (२) प्रयोग. आरूढ जीवनांत –(१) योग.

पहिली ठिणगी पडण्याला युगें गेलीं, पण आतां राख होण्याला त्रैराशिक मांडण्याची जरूर नाहीं.

चित्ताची एकाग्रता ही योगाची समाप्ति नव्हे. तिथून योगाची सुरवात आहे.

देव – एकवचन, देव आणि भक्त – द्विवचन, देव, भक्त आणि सेवा – बहुवचन.

ज्याला डोळ्यासमोर देव दिसता तो ज्ञानी झाला. पण पायाशीं देव उभा आहे एवढी श्रद्धा स्थिर झाली तरी साधकाला पुरें आहे.

अग्नीसाठीं जंगल तोडून रस्ता तयार करावा लागत नाहीं तोच आपला रस्ता पाहून घेतो. भक्ताला परिस्थिति कधींच प्रतिकूल नसते.

आर्त भक्त देवाचें हृदय आहे, जिज्ञासु देवाची बुद्धि, अर्थार्थी देवाचा हात आणि ज्ञानी देवाचा आत्मा.

तत्त्वज्ञान धर्माला बीजस्थानी आहे. बीजांतला अल्प फरक फळांत मोठा होऊन बसतो, म्हणून तत्त्वज्ञानांत सूक्ष्मता हवी.

तळमळ शांत होण्याला देवाचा प्रत्यक्ष स्पर्श पाहिजे, थोडें अंतरहि सहन होणार नाहीं. अगदीं ओठाजवळ धरलेल्या पाण्याच्या पेल्यानेंहि तृषा शमेल काय ?

प्रार्थनेपेक्षांहि प्रार्थनेंतून उत्पन्न होणारा वेग अधिक महत्त्वाचा आहे. ह्या वेगा-वरून प्रार्थनेची खोली मापावयाची.

वैराग्यांतहि साभिलाष वैराग्य आणि निरभिलाष वैराग्य असे दोन प्रकार आहेत. पहिल्याची उभारणी 'अनित्य' भावनेवर आहे, दुसऱ्याची 'असुख' भावनेवर.

तपाचे प्रकार — १ अज्ञानमूलक २ विषयमूलक ३ दंभमूलक ४ दुराग्रहमूलक ५ वैराग्यमूलक ६ प्रेममूलक ७ ज्ञानमूलक.

प्रतीक्षा आणि उपेक्षा पूरक भावना आहेत. साधकाला यथासमय दोन्ही पाहिजेत.

व्यक्तिगत प्रार्थनेनें मी देवाची मदत मिळवितों, सामुदायिक प्रार्थनेनें संतांची.

अंध श्रद्धा म्हणजे काय ?–'तर्क तो देव जाणावा' ह्या श्रद्धेचें नांव अंध श्रद्धा.

अर्थापेक्षां शब्द खोल आहे. शब्दापेक्षां भाव खोल, भावापेक्षां अभाव.

अपरिग्रहाच्या सिद्धीसाठीं हिंदुधर्मानें होळी पौर्णिमेची योजना केली आहे.

कृति उरावी पण कर्ता उरूं नये, हें भाग्य उपनिषदांच्या ऋषींचें. अहंकाराचा संपूर्ण नाश झाल्याशिवाय हें होणें नाहीं.

दोन बिंदु निश्चित झाले कीं सुरेखा निश्चित होते. जीव आणि शिव हे दोन बिंदु कायम केले कीं परमार्थ–मार्ग तयार झाला.

दैववादांत पुरुषार्थाला अवकाश नाहीं म्हणून तो नको. प्रयत्नवादांत निरहंकार वृत्ति नाहीं. म्हणून तो नको.

दैववादांत नम्रता आहे म्हणून तो पाहिजे. प्रयत्नवादांत पराक्रम आहे म्हणून तो पाहिजे.

ज्ञान मंत्र आहे. कर्म तंत्र आहे. उपासना दोहोंचा जोड बसवते.

तपाची टोचणी लावूं आणि जपाचे नगारे पिटीत राहूं तेव्हांच सुप्तात्मा जागा होईल.

ईश्वराची कला मला कितीशी कळली आहे ? आणि ज्या मला जी कांहीं कळली असेल तो 'मी' ही ईश्वराचीच कला नव्हे काय ?

बंधत्रय : १ आधारस्थानी विषयाचे नियमन. २ नाभिस्थानीं आहाराचे नियमन ३ कंठस्थानीं वाणीचें नियमन.

श्रीगणेशाय नमः म्हणजे श्रीगणेशाय नमः

मूर्तिपूजेचा अवश्य विधि नाहीं, पण मूर्तिभंगाचा अवश्य निषेध आहे.

संन्यास आणि योग एकाच ज्ञानाग्नीच्या ज्वाला आहेत.

सूर्य जेथें जातो तेथें प्रकाश घेऊन जातो. तसेंच सेवकाचें असलें पाहिजे. सेवक ज्या क्षणीं जेथें जें करीत असेल, त्या क्षणीं तेथें त्या कार्यांत त्याचा सेवकपणा त्याच्या-बरोबर असला पाहिजे.

श्वासोच्छ्वासाची क्रिया शरीरांतील सर्व रंध्रांनीं चाललेली असते, पण नाकांतून विशेष असते. सत्कर्मे रंध्रांच्या ठिकाणीं म्हटली तर उपासना नाकाच्या ठिकाणीं आहे.

लोकांच्या सूक्ष्म व्यवहारांत अनाहुत लक्ष घालण्याची सेवकाला मनाई आहे.

जी मूर्ति सर्वोपलभ्य नाहीं ती मूर्तिपूजेच्या शास्त्राप्रमाणें देवाची 'मूर्ति' होऊं शकत नाहीं.

अवतारांची जन्मभूमि, संतांची मृत्युभूमि आणि वीरांची कर्मभूमि धन्य होय.

आई ! बालकाच्या कानांत एकच आवाज घुमूं दे. आत्मा ! आत्मा ! आत्मा !

सत्य व्यवहारी अपूर्णांक नाहीं. आध्यात्मिक पूर्णांक आहे.

निद्रा आणि जागृति ह्या दोहोंचे गुण मिळून समाधि असते, दोहोंचे दोष मिळून स्वप्न.

गुण स्वतः प्रमाण, दोष, पुराव्याच्या अंतीं.

आत्मा 'न हन्यते' कारण ? 'न हन्ति'

माणसाचा मुख्य धर्म कोणता ?— माणुसकी.

दार बंद करून कोणी निजला तर सूर्य त्याची सेवा करण्यासाठीं त्याच्या दाराशी येऊन उभा राहातो. दाराला धक्का देऊन आंत शिरत नाहीं. मात्र जरा दार किलकिले झालें कीं आंत शिरलाच. ही सेवकाची मर्यादा दूर व तत्परता.

भिक्षा म्हणजे ईश्वरावलंबन, म्हणजे समाजाच्या सद्भावनेवर श्रद्धा, म्हणजे यदृच्छा–लाभ–संतोष, म्हणजे कर्तव्य परायणता आणि फलनिरपेक्ष वृत्ति.

डोळा सरळच पाहूं शकतो. मनानें डोळ्यापासून शिकावें.

युक्लिड म्हणतो, दोन बिंदूंतील कमीत कमी अंतर म्हणजे त्यांना जोडणारी सु–रेखा. ह्याच अनुभवावर सत्य उभें आहे.

मनोनिग्रह म्हणजे मानसिक शक्तींचा संग्रह.

‘ नातिमानिता ’ हा दैवी संपत्तीचा शेवटचा गुण सांगितला आहे. मागचे सर्व गूण अंगीं वसत असले तरी अभिमान न वाटणें हा त्याचा अर्थ आहे.

कोणी म्हणतात, आडांत नाहीं ते पोहऱ्यांत कोठून येणार ? मी म्हणतों— रस्सीत नाहीं ते पोहऱ्यांत येतेच कीं नाहीं ?

आत्मशुद्धीनें विजातीय द्रव्य एक तर बाहेर बाहेर फेकले जाते.

# वेदमूर्ति पं. सातवळेकर–कांहीं आठवणी

लेखक : प. तात्यासाहेब इनामदार

जागतिक कीर्तीचे वेदमूर्ति पं. सातवळेकर यांची जन्मशताब्दि गेल्या वर्षी झाली. आतां त्यानीं १०१ व्या वर्षांत पदार्पण केलें आहे. त्यानिमित्त त्यांचा सर्वत्र जयजयकार होत आहे. त्यांत आम्हींही सहर्ष सामील होत आहोंत.

अगदीं लहानपणीं सुमारें ७/८ वर्षांचा असतांना औंधला सोनबा सातवळेकर म्हणून एक चित्रकार आल्याचें आठवतें. त्यांनीं त्यावेळीं औंध येथें एक–दोन रंगीत पोर्टेट्स् काढलेले आहेत. मध्यंतरी ते येथें कांहीं दिवस आजारीही होते, पण पुनः त्यांची आठवण कधीं निघाली नाहीं. पुनः १९१९ सालीं जेव्हां पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर औंधला रहावयास आले त्यावेळी या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, आणि आश्चर्य कीं ते पूर्वींचे सोनबाच पुढें पंडितजी झाले.

( २ ) पंडितजी हे पूर्वीं लाहोरला होते. त्यांनीं लाहोर सोडून महाराष्ट्रांतच कोठेंतरी वास्तव्य करावें असें ठरविलें होतें. त्यावेळीं औंध संस्थानचे राजेसाहेब श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि यांच्या चांगलीं माणसें जवळ करणें व गुणग्राही-वृत्ति या स्वभावामुळेंच पंडितजींना औंधला यावें लागलें. त्यावेळीं ते पंचवटींत राहूं लागले.

( ३ ) पंडितजी हे प्रथम चित्रकार म्हणूनच आम्हांस माहिती होते. परंतु येथें आल्यावर त्यांचा दुसरा पैलू माहिती झाला आणि तो म्हणजे वेदाभ्यास होय. नंतर त्यांनीं येथें कांहीं मासिक काढावें आणि वेदाबद्दलही लेखन करावें असें ठरविलें. त्याप्रमाणें त्यांनीं 'पुरुषार्थ' हें मराठी आणि 'वैदिकधर्म' हे हिंदी मासिक काढलें. त्यांतूनच आम्हांस त्यांच्या विविध पैलूची म्हणजे कामाचा उरक, चिकाटी व दीर्घ-काळ श्रम करणें यांची थोडी ओळख झाली.

( ४ ) हळूहळू औंधच्या वातावरणांत त्यांचें मन रमलें आणि इतर बाबतींतही पंडितजी एक नागरिक म्हणून भाग घेऊं लागले. ते दर आठवड्याच्या वक्तृत्वसभे मध्यें भाग घेऊं लागले, ते येथील राजकारणांतही भाग घेऊं लागले. त्यावेळच्या

इंग्रजी राज्यांत त्यांनीं राष्ट्रकारणांत भाग घेऊं नये असें ठरविलें होतें, आणि या अटीवरच त्यांच्या येथील वास्तव्याला हरकत घेतली गेली नाहीं.

(५) १९२३ सालापासून औंध संस्थानच्या राज्यकारभारांत प्रजेलाही भाग घेण्याची संधि दिली गेली आणि त्यावेळीं प्रथम नेमलेल्या सात सभासदामध्यें पंडितजीही एक सभासद होते. पुढें ह्याचें रूपांतर विधानसभेमध्यें झालें. प्रथम नियुक्त सभासद व नंतर निवडून आलेले सभासद हा मान त्यांना मिळाला होता. त्या काळांत त्याची टीका अगदीं निर्भीड पण मार्गदर्शक अशी असे. त्यामुळें संस्थानचे सरकारला त्यापासून उपयोग होई. पुढें १९३८ सालीं राजेसाहेब व श्री. अप्पासाहेबांचेबरोबर पंडितजीसुद्धां महात्मा गांधीजींच्याकडे वर्ध्याला गेले होते व तेथें ७/८ दिवस राहूनच ग्रामपंचायतीपासून ते विधानसभेपर्यंत सर्व थरांत स्वराज्यामध्यें प्रजेला कसे अधिकार असावेत ह्यासंबंधीं घटना करून आणली. विशेष म्हणजे ती घटना महात्मा गांधीजींनाहि पसंत पडली. पंडितजींची टीका संयमशील असे त्यामुळें त्या टीकेचा कधीं विपरित परिणाम झाला नाहीं. त्यामुळें पुष्कळ टीका करीत असतांनाहि पंडितजींच्याबद्दल राजेसाहेबांचे मनांत असणारा आदर कधीं कमी झाला नाहीं. पुढें संस्थानी प्रजापरिषदेंतही त्यांनीं भाग घेतला व प्रजेला राज्यकारभारांत भाग घेऊं देण्याचे जे प्रयोग औंधमध्यें होत होते त्याचा अनुभव त्यांना पुष्कळ उपयोगी पडला.

( ६ ) पंडितजींचा वेदाचा अभ्यास फार सखोल व आधुनिक दृष्टीनें केलेला त्यामुळें एकंदर समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, देशाच्या संरक्षणाची व्यवस्था, ग्रामपंचयतीचे राज्य, शिक्षण, सैन्याची उभारणी व व्यवस्था असे अनेक विविध विषयावर त्यांची व्याख्यानें होत असत. प्रथम प्रथम आम्हांला त्यांचा हा वेदाभ्यास व ही अशी व्याख्यानें याबद्दल असें वाटावयाचें कीं हें पंडितजींचें एक वेड ( Fad ) आहे. कारण आधुनिक कोणताही शोध अगर विषय हा पूर्वी वेदामध्यें होताच असे दाखविण्याचे कांहीं लोकांचे एक वेडच असतें. पण पुढें पुढें आम्हांलाही पटले कीं वेद नुसते अर्थहीन पाठ करण्यानें जरी त्यांचें चांगल्या तऱ्हेनें रक्षण झालें असलें तरी त्यांतील शिकवण व विषयांची माहिती अज्ञात राहिल्यानें समाजाचें–राष्ट्राचें कवढें तरी नुकसान झालें.

( ७ ) औंध येथें पंडितजींनी अस्पृश्योद्धाराकडेहि बरेंच लक्ष दिलें. श्रीमंत राजेसाहेबांनीं अगोदरच शाळेंत कचेरींत वगैरे ठिकाणीं अस्पृश्यता धरूं नये असें बंधन घातलें होतें. हरिजनांनीं स्वच्छ रहावें, रोज स्नान करावें म्हणजे इतर लोकांमध्यें मिसळण्याला अडचण पडणार नाहीं व मंदिरप्रवेशासहि त्यांना मोकळीक होती, तेथेंहि अडचण पडणार नाहीं, त्यासाठीं त्यांची राहाण्याची घरें, त्यांची वस्तीही स्वच्छ असावी

म्हणून प्रयत्न होत असत. पंडितजी येथें आल्यानंतर त्यांनीं नियमितपणें अस्पृश्यांच्या वस्तींत जाऊन, स्वच्छता करून व ती त्यांच्याकडून करवून घेऊं लागले. कांहीं लोक वर्षांतून एखादे वेळेला येऊन सफाईमध्यें भाग घेत असत. परंतु अशा कामामध्यें सातत्याला फार महत्त्व असतें व त्यासाठीं पंडितजी स्वतः आठवड्यांतून ठरलेल्या दिवशीं नियमितपणें जावयाचे.

( ८ ) १९४२ सालींही पंडितजींनीं भूमिगतांना पुष्कळ मदत केली. कित्येक दिवस असे भूमिगत लोक त्यांचे घरीं सुखानें राहिले. परंतु त्यावेळीं ब्रिटीश सरकार डोळ्यांत तेल घालून अशाप्रकारचे भूमिगत कोठें आसऱ्याला आहेत हें पहात असत. अर्थात् आपल्यांतीलच कांहीं लोक ही माहिती पोलीसांना अगर सरकारला देत असत. परंतु उद्वेग येण्यासारखी गोष्ट म्हणजे पुढें १९४८ सालीं महात्मा गांधींचे वधानंतर जे ब्राह्मण समाजावर अत्याचार झाले त्याचीही झळ पंडितजींना लागली असती. ती केवळ संस्थानच्या सरकारनें योग्य रीतीनें पावलें टाकली, त्यामुळें औंध वाचलें व पंडितजींचे घर व छापखाना वाचला. अर्थात् जर कांहीं विपरित झालें असतें तरी त्या लोकांचे हातीं फक्त पुस्तकांशिवाय व कागदाशिवाय कांहींच लागलें नसतें. कारण पंडितजींच्याकडे मौल्यवान् दागदागिने, चांदीची भांडीकुंडीं वगैरे बेताचीच होती परंतु पुस्तकें व कागद वगैरे जळाले असते तर मात्र खरोखर पंडितजींचे व समाजाचें व समाजाचें–देशाचें भरून न येण्यासारखें मोठें नुकसान झालें असतें.

( ९ ) पंडितजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे म्हणून त्यांचेवर हा राग होता तरी-सुद्धां पंडितजी धीर गंभीरच राहिले. त्यावेळीं अगर त्यानंतरही त्यांनी माझेवर निष्कारण दांत ठेऊन माझें नुकसान करणार होते वगैरेबद्दल कोणापाशीं ब्रसुद्धां काढले नाहीं. वृत्ति अशी कीं झालें तर झालें जनतेच्या रोषाला बळी पडलों अगदीं निष्कारण तरी हरकत नाहीं. पण कधीं तक्रार नाहीं कीं त्यांचेबद्दल मनांत वैषम्य नाहीं.

( १० ) पुढें मार्च १९४८ मध्यें संस्थानें विलीन झाली. त्यानंतर मात्र ते माझ्याजवळ म्हणाले कीं मी औंध सोडून दुसरीकडे जावयाचें ठरविलें आहे. कारण एकतर संस्थानी राज्य नाहींसें झाल्यामुळें आतां संरक्षण मिळणें कठीण व दुसरें म्हणजे त्यांच्या छापखान्याच्या व्यापाला औंध येथें संस्थान गेल्यावर पुरेसें काम मिळूं शकलें नसतें. कारण ठिकठिकाणीं छापखाने झाले होते व बाहेरून काम आणून तें पुरें करून पुनः नेऊन देणें जमणें हें कठिण म्हणूनही बाहेर जावयाचें ठरविणें प्राप्त आहे. औंधचे सांस्कृतिक दृष्ट्या पुष्कळ नुकसान झाले पण देशाच्या दृष्टीनें हें बरें झालें.

(११) पंडितजींचें वागणें फार सौजन्याचे. कोणीहि आले तरी त्याची चौकशी स्वतः करून त्याला काय पाहिजे तें विचारून त्याचें काम होत असे. औंध येथें त्यांचे छापखान्याच्या कचेरींत गेलें कीं लेखन थांबवून काय असेल तें काम करून प्रथम मोकळे करीत व मग थोडे सद्यःस्थितीवर बोलून छापखान्यांत काहीं जुनेंनवें केलें असलें ते स्वतः दाखवून, नवी नवी तयार झालेलीं पुस्तकें अगर वेदांचे चाललेलें काम अगदीं आस्थापूर्वक समजावून सांगून दाखवीत असत. पारडीला गेल्यावर त्यांनीं या वयांतहि, अर्थात् ५।६ वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. स्वतः माझेबरोबर हिंडून सर्व दाखविलें व समजावून सांगितलें. घरींहि अगदीं वैयक्तिक लक्ष देऊन सोय गैरसोय पाहात व आवडीनिवडीकडेहि बारीक लक्ष असे. तसेंच माझेबरोबर एक मनुष्य देऊन किल्ला-पारडी, अतुल प्राडक्ट्स लेडरले वगैरे कारखानेहि पाहाण्याची व्यवस्था त्यांनीं स्वतः केली; कारण त्यावेळीं श्री. वसंतराव (त्यांचे थोरले चिरंजीव) बाहेरगांवी गेले होते.

**पंडितजींना प्रभु दीर्घ आयुरारोग्य देवो!**

—पुरुषार्थवरून साभार



# संत एकनाथ महाराज

## भक्त कसा असावा ?

संत एकनाथ हे एक थोर सत्पुरुष होऊन गेले. त्यांची योग्यता शब्दांनीं वर्णन करून सांगतां येण्यासारखी नाहीं. त्यांचा जन्म १५४८ त झाला. हल्लींच्या भाषेप्रमाणें म्हटलें म्हणजे सोळाव्या शतकाच्या मध्यभागी हे जन्मले व सत्रावें शतक लागतांना म्हणजे महाराष्ट्राला आतां नवीन तेज प्राप्त झालें, तेव्हां पन्नास साठ वर्षे राहून ह्यांचा पैठण येथें अंत झाला. रामदासांचें विशेष उद्योगसामर्थ्य त्या काळीं पाहिजे होतें, पाहिजे आहे व कोणत्याही काळीं तें पाहिजेच. ज्ञानेश्वरांचें विशेष म्हटलें म्हणजे निरनिराळ्या सांप्रदायांची एकवाक्यता करून दाखविणें हें होय. तें त्यांनीं चरित्र अवतरून दाखविलें.

एकनाथांचें चरित्रही विशेष योग्यतेचे आहे, हें कित्येकांना समजत नाहीं. ते म्हणतात कीं, ह्या चरित्रानें महाराष्ट्राचा काय भाग्योदय झाला ? जर तुमच्या म्हणण्या-प्रमाणें ज्ञानेश्वरांचेंही विशेष पूजनीय व रामदासांचेंही विशेष वंद्य, तर परस्पर विरोध येतो. विशेष आणि तें सारिखें कसें ? रामदासाला नमस्कार करावयाचा आणि तुकारामांनाही वंदन करावयाचें, तरी दोघांचीही विशेषें अनुकरणीय कशीं ? वास्तविक पाहिलें, तर हे किंवा अशा प्रकारचे प्रश्न बुद्धीच्या संकोच्यामुळें पुढें आणण्यांत येत असतात. त्यांना ह्या प्रश्नाचें साहजिक उत्तर समजत नाहीं, हें त्यांचें दुर्भाग्य; दुसरें कांहीं नाहीं. आपण एका सुंदर वनांत गेलो, आणि तेथें भागीरथीसारखी नदी वाहतांना पाहिली, म्हणजे मन थंड व तन्मय होऊन जातें व ईश्वराचें कौतुक आपणांस नदीप्रवाहानें दिसूं लागतें. जरा वर झालों म्हणजे हिमालयाचे डोंगर दिसूं लागतात. त्या डोंगरांच्या रांगा पाहून पृथ्वीवर पृथ्वी रचण्यांत आली आहे कीं काय असें वाटतें व आत्मा तन्मय होऊन उन्नत होतो व त्याला उपरति प्राप्त होते. आतां येथें असा सहज प्रश्न होणार आहे कीं, आपण नदीला कसे भुलली व पर्वतालाही लागलींच भुललों, हें कसें ? विशेष स्पष्टीकरणा-साठीं आपण एखादी बाग घेऊं. एखादा मनुष्य एखाद्या फुलाचा वास घेऊन डुलूं लागतो, इतक्यांत दुसऱ्या वाटिकेंत जातो, तेथल्या फुलांचा वास घेऊनही सापा-सारखा डुलूं लागतो. हें पाहून त्याचा मित्र म्हणतो, "काय रे, त्या गुलाबाच्या फुलाचा वास घेऊन तुला आनंद होतो आणि त्या मोगरीच्या फुलाचा वास घेऊनही

तूं आपला डुलूं लागतोस, ह्यावरून तुझ्यांत कांहींतरी दोष आहे खास." ह्यावर फुलांचा भोक्ता उत्तर देईल कीं, "बाबा रे, हा सगळा दोष तुझाच आहे. तुला समुद्राची थोरवी कळत नाहीं व समुद्राचें अगाधत्वही समजत नाहीं. नदींत अवगाहन केलें म्हणजे तेथेंच रहावेंसें वाटतें व समुद्राचा अपारपणा पाहिला म्हणजे तेथें मन रममाण होतें. ह्याला उपाय नाहीं." हाच प्रकार विशेषांसंबंधीं आहे. विशेष वैचित्र्याची हीच खूण आहे कीं, एका गोष्टीसारखी दुसरी गोष्ट नाहीं. पात्रासारखी नदी नाहीं, नदीसारखें पात्र नाहीं. आपण येथें बसलेली माणसें डोंगरासारखी नहींत व आपण सर्व जरी माणसें आहोंत, तरी आपण भिन्न आहोंत. आपणा सर्वांत कांहीं ना कांहीं तरी विचित्रपणा आहेच. त्याशिवाय चांगल्यांत व वाइटांत विचित्रपणा आहे. अशीच ही परमेश्वराची राहटी आहे. एकादशी अथवा द्वादशी ह्यांच्यासंबंधीं जसा अर्थवाद आहे, तसा ह्या शब्दासंबंधीं नाहीं. जेवणांत पराक्रम नाहीं. विरक्ति उत्पन्न व्हावी म्हणून एकादशा व द्वादशा करावयाच्या, त्यांपैकीं कोणाला एक मार्ग आवडतो तर कोणाला दुसरा आवडतो. त्याचप्रमाणें निरनिराळ्या साधूंचीं, निरनिराळ्या थोर पुरुषांचीं निरनिराळीं विशेषें आहेत. रामदासांचें विशेष महाराष्ट्रधर्म वाढवावा हें होय. तसें एकनाथांचें विशेष काय? तर भागवतधर्म हें एकनाथांचें विशेष. हा नवीन दिसणारा धर्म, तेव्हां सकृद्दर्शनींच अश्रद्धा उत्पन्न व्हावयाची. भागवतधर्म म्हणजे, संस्कृतांत जें भागवत आहे तें प्राकृतांत कळावें, म्हणून एकनाथांनीं प्राकृतांत लिहिलें तो. भाविक लोक व बायका भागवत वाचतात तें भागवत पौराणिक होय. हें जें एकनाथांचें भागवत आहे तें तत्त्वविचारपरिपूर्ण आहे. तें पाहावें, त्यांतील विशेष भागाचें मनन करावें, म्हणजे आपली खात्री होईल.

हल्लीं लोकांना विचारलें कीं तुमचा धर्म कोणता, म्हणजे कोणी म्हणतात कीं, एकेश्वरी व कोणी म्हणतात कीं, आम्ही पुष्कळ देव मानणारे. परंतु आपल्या लोकांत एकच ईश्वर मानितात, तेव्हां दोहोंचा संभवच नाहीं. तेथें एक म्हणणें शब्दाचें वैयर्थ्य होतें. आम्ही स्वतःला भागवतधर्माचे म्हणतों. दहावीस वर्षांपासून आम्ही असें म्हणावयास लागलों. भागवतधर्माचीं लक्षणें पुढें सांगतों. पण हा धर्म कोठून काढिलात, ह्या प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे. बीं रुजलें कीं प्रथम त्याचें टरफल वर आलेलें दिसूं लागतें. पहिल्यानें बीं उकलून मोड येतो, पुढें त्याचें झाड होतें व त्याला फांद्या, फुलें व नंतर फळें येतात. जसें बीज एका मुळापासून उत्पन्न होऊन त्याचा मोठा प्रभाव झालेला असतो, त्याचप्रमाणें सर्व अनादिकालापासून रुजत आलेला जो धर्मविचार त्याचें आत्यंतिक सार भागवतधर्म होय. त्याचा मूळ संबंध सोडतां कामा नये; तो विलायतेंतील झाडाप्रमाणें येथें आणिलेला नाहीं. त्याचीं पाळें मुळें खोल गेलीं आहेत. त्याचा शोध अनाधिकालापासून करावा लागेल. त्याचें

फळ, वास किंवा गोडी म्हटलें तर चांगलें कोणतें व त्याचें अधिकरण कोणतें? ह्या भागवताचे सारभूत कोणतें? कित्येक लोक असें म्हणतील कीं, तुम्ही सर्व मनांतल्या गोष्टी सांगतां. रामदास समर्थ कसले व एकनाथ भक्त कसले? हे गृहस्थ असून उदरपोषण करीत. सारांश आपल्यासारखेच हे, पण तसें नाहीं.

आतां भागवतधर्म कोठें कथन केला आहे तें पाहूं. हा धर्म अमुक एक ठिकाणीं प्रविष्ट झाला ह्याविषयीं इतिहास आहे. तो थोडक्यांत सांगतों. दहावीस लोकांच्या समाजाला धर्म म्हणत नाहींत. तसेंच मूळ सोडतां कामा नये. फळाचा आस्वाद घेतला आणि मुळाचा कांहीं संबंध नाहीं असें मानणें ठीक नव्हे. धर्मालासुद्धां संतति असते.

आतां भागवतधर्माचा इतिहास पाहूं. कलियुग समीप यावयाच्या वेळीं, म्हणजे द्वापाराच्या अंतीं, नारदानें हा धर्म श्रीकृष्णाच्या बापाला म्हणजे, वसुदेवाला सांगितला. तो धर्म विदेहजनकाला नऊ ऋषभ नामक ऋषींनीं सांगितला. ती कथा पुढें लिहिल्याप्रमाणें आहे :— एकदां जनकाच्या येथें यज्ञ होता. त्या यज्ञाला विश्वामित्रवसिष्ठादिक ऋषि हजर होते व ज्यांना नऊ ऋषभ म्हणतात ते ऋषिसुद्धां त्या यज्ञाला आले होते. जसा बौद्धांचा कपिलवस्तूचा राजा सिद्धार्थ, तसेंच जैनांचे मुख्य हे ऋषभ होत ( त्यांना जैन लोक ऋषभ म्हणतात ). ह्यांच्याविषयीं ज्या कल्पना आहेत त्या सार्थ आहेत किंवा नाहींत, हें पहाणें प्राचीन इतिहासाचा शोध लावणारांचें आहे. त्यांना त्यांची चाड असली पाहिजे. ह्या ऋषभांना जनकानें असा प्रश्न विचारला कीं, अत्यंत श्रेय कशांत आहे? कोणाचा देश कसा घ्यावा, शत्रूला कसें मारावें, सोन्याचें रुपें व रुप्याचें सोनें कसें करावें ( हल्लींच्या राजांना ही चिंता पडली आहे ) तशी चिंता जनकाला पडली नव्हती. त्याला धर्म जाणण्याची चिंता पडली होती. म्हणून त्यानें वरील प्रश्न विचारला. त्याचें उत्तर असें होतें कीं, आत्यंतिक श्रेय भागवतधर्मांत आहे. तो भागवतधर्म नारदानें वसुदेवाला सांगितला, शुकानें परीक्षितीला सांगितला, नऊ ऋषभांनीं जनकाला सांगितला, एकनाथांनीं आपणांस सांगितला व मी तुम्हांला सांगतों असा भाग येतो. ज्या भागवतांत भागवतधर्म आहे, तें भागवत केव्हां लिहिलें, असा प्रश्न उद्भवतो. भागवतधर्म पांच हजार वर्षांपूर्वींचा असावा. पण त्याच्या वयावर त्याची महती नाहीं. वयापेक्षां विचार अत्यंत श्रेयस्कर. गंगेची उत्पत्ति जशी आकाशांत अशी समजूत आहे, तशी विचारांची उत्पत्ति देवापाशीं. विचारांची उत्पत्ति परमेश्वराच्या समकालीन आहे. कारण, परमेश्वर चैतन्यरूप, विचारक्षम आहे. हा भागवतधर्म ज्ञानेश्वरींत कोठेंकोठें आहे. पण एकनाथांच्या प्राकृत ग्रंथांत जसा तो स्पष्ट आहे, तसा कोठेंच नाहीं. सांगण्यासांगण्यांत फरक

असतो. जें कांहीं आपण सांगतों त्याचा प्रत्यय आपल्यांत असला पाहि तरच तें सांगण्याचा आपणांस अधिकार. अशा लोकांचा उपदेश मेल्यान सुद्धां लोकांच्या मनावर चांगला ठसतो. एकनाथाला आकाशवाणी झाल्यानं त्यांनीं बारा वर्षें अध्ययन करून बावीस हजार ग्रंथ लिहिला, अशी कथा आ त्यांच्या ग्रंथांत भागवतधर्म तर दिसलाच, पण, चरित्रांतही दिसला. भागवतध चरित्रांत दाखविणें हें विशेष भाग्य एकनाथांचेंच होतें. हा भागवतधर्म सांगण्या सोपा, पण आचरण्यास कठीण असा आहे. ज्ञानेश्वरांत गृहस्थाश्रम कमी, त्याचप्रमा रामदासांतही गृहस्थाश्रम कमी. ब्रह्मचर्याच्या मार्गी मोह कमी. परंतु एकनाथां गृहस्थाश्रमीं राहून संसार वगैरे करून, भागवतधर्माचा प्रभाव विशेष रीतीनें दाखविल हें विशेष आहे. त्यांचे चमत्कार व साक्षात्कार दुसऱ्या ठिकाणीं सांपडतील; पण त्यांच रोख भागवतधर्माकडे होता व तो धर्म त्यांनीं स्वचरित्रांत दाखविला हें आपण पहावयाचें. त्यांच्या ओव्यांचीं कांहीं टिपणें येथें आणिलीं आहेत, तीं वाचू दाखवितों म्हणजे भागवतधर्म म्हणजे काय हें आपणांस समजेल.

इंद्रियें कोंडितां न कोंडती। विषय न सांडतां न सांडती।
पुढतपुढतीं बाधों येती। यालागीं हरिभक्ति द्योतली वेदें ॥ १ ॥

इंद्रियें कोंडावी न लागतीं। सहज राहे विषयासक्ती।
एवढें सामर्थ्य हरिभक्ति। जाण निश्चितीं नृपवर्या ॥ २ ॥

योगी इंद्रियें कोंडिती। ते भक्त लाविती भगवंतीं।
योगी विषय जे त्यागिती। ते भक्त अर्पिती भगवंतीं ॥ ३ ॥

योगी विषय त्यागिती। त्यागितां देहदुःखी होती।
भक्त भगवंतीं अर्पिती। तेणें होती नित्यमुक्त ॥ ४ ॥

दारा सुत गृह प्राण। करावे भगवंतासी अर्पण।
हे भागवतधर्म पूर्ण। मुख्यत्वें भजन या नांव ॥ ५ ॥

इत्यादि. पूर्वापार आपण असें मानीत आलों कीं, इंद्रियनिरोध हा मुख्य आहे तो साधण्याकरितां योगादि साधनें आहेत. तीं आपणांस साधतां आलीं नाहींत, म्हणून त्यांची निंदा करणें अन्यथा होईल. आपण इंद्रियें कोंडावयास लागावें, पण तीं कोंडत नाहींत व विषय सोडावयास जावें, पण तो सुटत नाहीं. त्याकरितां ऋषींनीं हरिभक्ति हें साधन सांगितलें. दोघांचेंहि ( योगी व भगवद्भक्त यांचे ) साध्य एकच, म्हणजे भगवद्प्राप्ती हें होय. परंतु मार्ग निराळे. इंद्रियनिरोध ही पूर्वापार चालत आलेली गोष्ट आहे व आपणांससुद्धां तिचा थोडाबहुत अनुभव आहे. आपण थोडासा निरोध करावयास जातो, पण आपणांला आकलन करिता येत नाहीं

विषयीं तुकारामाचे पुष्कळ अभंग आहेत. विरक्ती व वैराग्य हें त्यांनीं साधावें. ण तुमची आमची काय गति ? 'भाळींभोळीं कैशीं तरती,' हा विचार एकनाथांच्या नांत होता. आम्ही लंगडीं व थोटीं माणसें. आम्ही शास्त्राध्ययन करावें, तर पोटा-गची काळजी सुटत नाहीं. अशी कोट्यावधि प्रजा. तेव्हां अशा प्रजेच्या गतीचा कच मार्ग आहे. तो हा कीं, हरिभक्ति. आम्हांला योगमार्ग नको, ज्ञानमार्ग नको, वा कर्ममार्गही नको. आम्ही ब्राह्मण आहों, पण शास्त्रांचें अध्ययन करणारे फार डे. कारण, बऱ्याचजणांना पोटाकरितां अर्जन करावें लागतें. तेव्हां इंद्रियनिरोध त नाहीं. ज्ञानाचा व कर्माचासुद्धां आम्हांला उपयोग व्हावयाचा नाहीं. तेव्हां ह्या र्गांपेक्षांही एक विशेष सुलभ मार्ग आहे, तो आम्हांला पाहिजे. तो एकनाथांच्या रित्रांत जास्त आहे.

न करितां वेदशास्त्रव्युत्पत्ति । ऐशिया अज्ञाना निजात्मप्राप्ति ।
सुगम जोडे ब्रह्मस्थिति । यालागीं हरिभक्ति प्रकाशिली देवें ॥ १ ॥

तें हें राया भागवत जाण । मुख्यत्वें भक्ति प्रमाण ।
भावें करितां भगवद्भजन । अज्ञान जन उद्धरती ॥ २ ॥

स्त्री शूद्रादि अवघे । घालूनियां ये नावे ।
एकेच खेपें स्वयें न्यावे । भजनभावें परतीरा ॥ ३ ॥

येथें पोहणेंयाविण उतरणें । प्रयासेंविण प्राप्ति घेणें ।
सुखोपायें ब्रह्म पावणें । यालागीं नारायणें प्रकाशिली भक्ति ॥ ४ ॥

भागवतधर्माची स्थिति । भाळींभोळीं भवाब्धि तरती ।
सुखोपायें ब्रह्मप्राप्ती । तेंचि श्लोकार्थीं विशद सांगे ॥ ५ ॥

स्त्रीक्षुद्रादिकांस हा मार्ग सुलभ आहे. कारण, ह्या मार्गानें एकाच खेपेस एकाच वेतून स्त्रीशूद्रादि अवघीं नेण्यांत येतात; कर्ममार्गी सांगतात कीं, चौऱ्यायशी लक्ष ल्यांतून आल्यावर, ब्राह्मण नसले तर ब्राह्मण होऊन ज्ञानी झाल्यावर, कालमर्यादा ल्यावर, तुमचा उद्धार होईल; पण ह्या समजुतीनें मनाची हुरहुर जात नाहीं. ह्या र्गानें गेलें असतां बहुत कालानें आपण देवापाशीं सायुज्यता पावणार. तेव्हां मार्गानें मनाचें समाधान होत नाहीं. आम्हांलीं अशी नाव पाहिजे कीं, जी परांत चौऱ्यायशी लक्ष फेऱ्यांत आम्हांला न फिरवितां एका खेपेस आमचा द्धार करील. असें साधन कर्ममार्गी म्हणतात आमच्यापाशी नाहीं. ज्ञानमार्गी णतात, आहे; पण जे महाभाग व योगमार्गी पुरुष तेच एका खेपेस पैलतीरास तील, तेव्हां आमच्यासारख्यांची वाट काय? अर्थात् भागवतधर्म. भागवतधर्म

म्हणजे काय ? तो वैदिक, पौराणिक नव्हे; किंवा ज्ञान, योग, कर्म किंवा तीर्थें, व्रतवैकल्यें इत्यादि करणें नव्हे.

व्यासांनीं पुराणें केलीं; पण त्यांची हुरहुर राहिली नाहीं. जेव्हां त्यांनीं भागवत लिहिलें, तेव्हां त्यांचें समाधान झालें. परिक्षित्यादींनीं तें ऐकिलें. तेव्हां त्यांचें देखील समाधान झालें; तसेंच जर आपण वाचाल, तर आपलेंसुद्धां समाधान होईल. आमच्यासारखे अज्ञानी, इंद्रियनिरोध करण्यास असमर्थ म्हणून त्यांच्याकरिता हा भगवंतानें सांगितलेला भागवतधर्म होय. ह्याच्यासंबंधानें वैष्णव व शैव ह्यांच्यांतील भांडणासारखीं भांडणें नाहींत. भगवतांतील देव सर्व देवांचा देव आहे. तो एकनाथानें आपल्या चरित्रानें आपला केला; ज्ञानेश्वराच्या चरित्रासारखें आपलें चरित्र होण्याची अपेक्षा करावयास नको. कारण, पहिली गोष्ट ही कीं, त्यांचा बाप संन्यासी होता. तुम्हांआम्हांला असे संन्यासी पैदा करितां यावयाचे नाहींत. दुसरी गोष्ट ही कीं, त्यांचा तर काय, पण त्यांच्या दोघांही भावंडांचा व्रतबंध करूं दिला नाहीं. हा बोजाचा विचार झाला. आतां त्यांचा अधिकार तरी कसा आणावा ? तेव्हां आम्हांला हा मार्ग साध्य नाहींच. मग तुमचीआमची वाट काय ? आपण साधीभोळी मंडळी खरी व आपण आळशी आहों, तरी आपणाला भगवत्प्राप्तीची इच्छा होते. ज्ञानमार्गाचें अवलंबन केलें असतां ती परिपूर्ण होत नाहीं. ज्ञानमार्गाप्रमाणें पहिल्यानें ब्राह्मण असले पाहिजे. नामधारी ब्राह्मण पुष्कळ आहेत. त्यांपैकीं ज्ञानप्राप्ती सर्वांसच करण्यास फुरसत कोठें असते! पेन्शन् घेतल्यावर तसें करावें, तर पेन्शन् घेण्यापूर्वींच आमची मंडळी आटोपते! काल आठले वारले व मागे पंडित वारले. हिंवाळ्यांत जशीं झाडांचीं पानें शुष्क होऊन गळतात, तशी आमची मंडळी एकामागून एक गळूं लागली आहेत. सारांश, पेन्शन् घेण्यापूर्वींच ही गोष्ट संपादावयास अवकाश राहिला नाहीं. तेव्हां दहावीस वर्षांचा मक्ता घेतो कोण ? आमच्यामार्गें लचांडें भारी. म्हणून आम्हांला भक्तिमार्ग उत्तम होय. शांडिल्य सूत्रापासून तों एकनाथापर्यंत हा मार्ग सांगण्यांत आला आहे. भक्तांचीं लक्षणें पुष्कळ आहेत. पण पुढील एका लक्षणाच्या पोटांत तीं सर्व आहेत. तें हें कीं, देवच काय तो एक आपला श्रेयस्कर. ह्यावरून एकनाथ हें नांव सार्थ आहे. देवावर आपलें आत्यंतिक प्रेम ठेवावें. वर्णाश्रमधर्म सोडून निरहंकृति राहिलें पाहिजे. अमुक एक वर्णांत मी जन्मलों, म्हणून मी थोर, असें मानिता कामा नये. मी पांढरा अंगरखा व गुलाबी पागोटें घातलें आहे, म्हणून मी त्यांचा अभिमान धरावा, हें ठीक नव्हे. वर्णादि प्रकार प्रासंगिक किंवा सहजगत्या आलेल्यापैकीं आहेत. म्हणून त्यांचा अभिमान धरूं नये. तर निरहंकृति राहून भक्ति करावी. भक्तीच्या ठायीं प्रीति, मुक्ति, वैराग्य व सर्व कांहीं आहे. म्हणून भक्त म्हणतात कीं, आम्हाला मुक्ति नको, किंवा विरक्ति नको,

भक्ति पाहिजे. हा भक्तिमार्ग सुलभही आहे व अवघडही आहे. देवावर प्रेम ठेविल्यानें हा मार्ग साधितां येणार आहे. असा भागवतधर्माचा अनुभव आहे. स्वर्ग व धर्म ह्यांच्यामधील हा पूल आहे. आपणांला संस्कृतांत सांगितलेला वस्तऱ्यांचा पूल नको. समजा, मुंबई व माहीम ह्यांच्यामध्यें वस्तऱ्यांचा पूल बांधिला, तर त्याच्यावरून जाणें अवघड होईल. आपणांला असा पूल पाहिजे कीं, त्यावरून म्हातारे पोरेंबाळेंही सर्व जाऊं शकतील. सारांश जनरस्ता पाहिजे. त्याचप्रमाणें आपणांस सर्वांस समजेल असें धर्मसार पाहिजे. आपलें मुख्य कर्तव्य भगवताची ओळख व्हावी, हें आहे. ती कशी होईल ह्याविषयीं तुकारामांनीं व ज्ञानदेवांनीं सांगितलें आहे. पण एकनाथचरित्रांत त्याची परिस्फुटता विशेष दिसून येते. ह्या पुरुषाची आठवण व्हावी म्हणून त्याची पुण्य-तिथि केली पाहिजे. ह्यांच्यासारखे भाग्यवान् पुरुष इतर देशांत झाले असतील, नाहीं असें नाहीं. मोझेस झाले, ख्रिस्त झाले, महंमद झाले, पण आपणाला त्यांच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. तर जे एका रक्तामांसाचे, त्यांच्याविषयीं आम्हांला विचार करावयाचा. त्यांच्या शरीराचें मांस जर आमच्यांत आहे, तर त्यांच्या विचारांचें मांस आमच्यांत कां असूं नये? गीतारहस्य सर्वांस सुलभ करण्याकरितां ज्ञानेश्वरांनीं अवतार घेतला, सामर्थ्य दाखविण्याकरितां रामदास जन्मले व तुम्हांआम्हांकरितां एकनाथांचा जन्म होय. त्यांनीं भक्त कसा असावा व देव कोणाला म्हणावें, ह्या गोष्टी भागवतांत सांगितल्या आहेत. हें भागवत वाचिलें असतां मनाला शांति वाटून कृतार्थता वाटेल. बायका-मुलांनीं जर विचारिलें कीं, आमचें कल्याण कशानें होईल तर त्यांना सांगावें कीं, भागवतधर्म पाहिल्यानें. सारांश, हरिभक्ति करावी, साधुसमागम ठेवावा व ईश्वरावर निर्मळ प्रेम ठेवावें.

—न्या. मू. रानडे यांचें प्रवचन.



# ज्ञान–सागर

वस्त्र ज्याप्रमाणें दोन धाग्यानी विणलेले असते त्याचप्रमाणे जीवन सुखदुःखाच्या धाग्यांनी विणलेले असते.

—वि. स. खांडेकर

हरविलेले बाळपण संपादन करणे म्हणजे जीवनांत यशस्वी होण्यासारखे असते.

—ना. सी. फडके

रणभूमी ही सर्वांसाठीच असते. त्यात ज्याना मरण येते ते भाग्यवंत ठरतात.

—राधाकृष्णन्

परमेश्वर अवतार येतो तो कर्मरूपाने व्यक्त होतो, मनुष्यरूपाने नव्हे.

—गौतम् बुद्ध

लेक आणि लोभ ह्या दोन गोष्टी संसारांत वाईट आहेत. कारण ह्यापासून क्रोध उत्पन्न होतो. व लोभामुळें मोह नाश होतो. हेच संसारात पापाचे मूळ आहे.

—महाभारतावरून

आयुष्याच्या खडतर बागेत फुलणारे कर्तव्य हे एक फूल आहे.

—विवेकानंद

बायकोमुलांची आठवण करून करून तडफडत मरणे ते वाईट मरण होय; पण संपूर्ण आशा सोडून ईश्वरचिंतन करीत मरणे छान.

—जपानी म्हण

राष्ट्रात मुलासाठी इस्टेट सोडून जाणाऱ्यांची वाण नाहीं. उणीव आहे तीं मुलांसाठी आरोग्य, शील, प्रेम, त्याग आणि ईश्वरभक्ती हे पंचधन सोडून जाणाऱ्यांची.

—सावरकर

# भाव तोचि देव

'भाव म्हणजे काय ?' असा प्रश्न उद्भवतो. ऑलिव्हर क्रामवेल असें म्हणतो कीं, He who has steps has faith. याचा अर्थ असा कीं, जो कोणी मुळींसुद्धां न डगमगतां संसारामध्यें वावरतो, आयुष्यांतील अनेक प्रकारचीं कर्तव्यें करीत असतां मग तीं कठीण असोत किंवा सोपी असोत, आनंददायक असोत किंवा कंटाळवाणी असोत, जो कोणी मनाचा समतोलपणा कायम राखतो त्याच्याच ठिकाणीं भाव आहे असें म्हणतां येईल. आपणच पहा कीं साधारणपणें कोणत्या मनुष्याची आपण वाहवा करतो ? जो मनुष्य कोणत्याही प्रसंगास टक्कर देण्यास तयार असतो, जो यश प्राप्त झालें असतां फुगून जात नाहीं किंवा अपयश आलें असतां दुर्मुखलेला होऊन बसत नाहीं, अशाच मनुष्याची आपण साधारण माणसें देखील तारीफ करीत नाहीं काय ? आपण जन्मल्यापासून तो आपला अन्त होईपर्यंत भावाच्या योगेंच आपल्या आयुष्यांतील निरनिराळ्या कृत्यांची जणूं काय एक पूर्ण सांखळीच बनलेली असते. त्या सांखळीलाच आपण आपलें जीवित असें म्हणतों. लहान मुलें आजारी असतांना तीं आपल्या आईनें दिलेलें कडू औषधही विश्वासानें घेतात ! याचें कारण असें कीं, तें घेतलें असतां त्यांना आराम पडेल व त्यांच्या वेदना नाहींशा होतील असें त्यांना जें सांगण्यांत येतें, त्यावर त्यांचा विश्वास बसतो; हें आपण नेहमीं पाहत नाहीं काय ? तर मग पुढें सुख होईल या आशेनें चालू सुखावर पाणी सोडावयाचें व तात्कालिक दुःख सहन करावयास तयार व्हावयाचें, या गोष्टी भावाच्या योगें आपण शिकतों. म्हणून भाव हा जीविताचा पाया आहे असें जेव्हां मी म्हणतों, तेव्हां हेंच तत्त्व आपल्या आयुष्यांतील साधारण गोष्टींस व असाधारण समाजसेवा, सामाजिक सुधारणा, धार्मिक प्रगति यांविषयीं आपल्या ज्या कल्पना त्यांनाही लागूं करावयाचें असा माझ्या बोलण्याचा आशय आहे. कोणत्याही उद्योगांत तुम्ही असा, परंतु एक गोष्ट तुम्हांस करावयास हवी, ती ही कीं, तुम्ही तात्कालिक सुखास बाजूस सारून कांहींतरी स्वार्थत्याग करावयास तयार असलें पाहिजे. हा जो श्रेष्ठ गुण भावरूपी देणगी—तो अंगीं असला म्हणजे आपल्यावर जरी अनेक संकटें आलीं, आपणांस अनेक अडचणी सोसाव्या लागल्या, किंवा आपल्या मार्गांत अनेक अडथळे आले, तथापि त्यांयोगें आपल्या मनाची चलबिचल न होतां आपलें मन स्थिर रहातें, व शेवटीं आपल्या हातून कांहींतरी चांगलें व थोर असें सत्कृत्य घडून येतें. या भावरूपी देणगीमुळेंच प्रसिद्ध इतिहासकार जो गिबन् त्याला त्याच्या संकटसमयीं

सहाय्य मिळालें; सुखाची पर्वा न करतां व दुःख सहन करून इतिहास लिहिण्यास उत्तेजन मिळालें व ह्याच गोष्टीमुळें त्याचें व त्याच्या इतिहासाचें नांव चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे. आपलें इतिहासलेखनाचें काम करीत असतांना त्याच्या मनाला जो आनंद व उत्साह वाटत असे, त्या वृत्तीशीं त्या प्रचंड ग्रंथाची शेवटची ओळ संपविल्यावर त्याच्या मनाला जी उद्विग्नता प्राप्त झाली, तिची तुलना केली म्हणजे एक गोष्ट तुम्हांला स्पष्टपणें समजून येईल कीं, एखादी मोठी गोष्ट साध्य करून घेण्याकरितां, तुम्हीं जेव्हां मनोभावें तिच्या पाठीमागें लागतां, वर्षानुवर्षें श्रम करितां, कितीही अडचणी आल्या तरी त्यांस न जुमानतां, तुमचा निश्चय ढळूं देत नाहीं, पुरतेपणी ती साध्य कशी होईल, याविषयीं नेहमीं आतुर असतां; ती साध्य होईल अशी तुमची खात्री असते, आणि शेवटीं तुमचें ध्येय तुम्हांस प्राप्त झालें असतां, पूर्वीचा तो चिंतेचा काल तुम्हांस किती आल्हाददायक वाटतो! अशा प्रकारचा आनंद पुन्हां अनुभवण्यास मिळावा, असें तुम्हांस वाटत नाहीं काय? परमार्थ साधा असा जो उपदेश साधुसंत करितात, त्या उपदेशाचें सार हें कीं, तुमचें जें थोर प्राप्तव्य तें साध्य करीत असतांना, वाटत ज्या अडचणी येतील, त्यांस न डगमगतां तें साध्य करा व तें प्राप्त झाल्यावर मिळणारा जो परमानंद त्याचा लाभ घ्या. परमार्थ प्राप्त करून घेण्यास संसार किंवा जनसंमर्द यांचा त्याग करण्याची जरुरी नाहीं. लोकांमध्येंच राहून, हरएक प्रकारचा गलबला ऐकूनही, त्याकडे दुर्लक्ष करा, आपले ध्येय सतत डोळ्यापुढें ठेवून त्याच्या प्राप्त्यर्थ प्रयत्न करा असेंच साधुसंत आपल्याला सांगतात. जगाच्या निरनिराळ्या प्रकारच्या अनुभवांचें हेंच एक सार आहे. म्हणून आपण मनुष्यजातींत दिसून येणाऱ्या दोषांपासून, तसेंच काळाच्या जुलमांपासून अलग असावें, समाजसंसर्गांमुळें जे मोह आपल्यास वारंवार उत्पन्न होतात, त्यापासून आपण दूर रहावें, या गोष्टी करावयास भाव आपणांस सांगतो. कालाच्या जुलमास न जुमानणें म्हणजे आपलें कर्तव्य झुगारून देणें किंवा तें दिरंगाईवर टाकणें नव्हे, तर कसाही प्रसंग येवो, आपल्या कर्तव्यामध्यें खंड पडूं द्यावयाचा नाहीं व अंतःकरणांत असा दृढभाव धरावयाचा कीं, योग्य वेळीं आपल्या श्रमांचें चीज हें होणारच; आपल्यास सिद्धि प्राप्त होणारच म्हणून आज काळ व्यर्थ दवडूं नका. ज्या अडचणींशीं तुम्हांस टक्कर देणें अवश्य आहे त्या अडचणी पुढें आपोआप नाहींशा होतील, या शुष्क आशेनें स्वस्थ बसूं नका. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे साधूंची आपणांस अशी ताकीद आहे कीं, तुम्ही आपल्या मनोविकारांचे दास बनूं नका.

आपल्या इंद्रियांस जे मोह उत्पन्न होतात ते प्रथमदर्शनी सुखकर वाटतात, त्यांच्याकडे आपलें मन वेधलें जातें. परंतु वास्तविक पहातां जसें एकादें जहाल

विष दिसण्यांत रमणीय अतएव मोहकारक असतें, पण तें घेण्याची ज्यांना ज्यांना भुरळ पडते, त्यांना तें आपत्तींत लोटल्याशिवाय रहात नाहीं व अखेरीस ते करणाऱ्याच्या मृत्यूस तें कारण होतें; त्याप्रमाणेंच इंद्रियास मोहित करून टाकणारीं हीं जीं सुखें त्यांची अशीच गोष्ट आहे. व्यक्तीच्या बाबतींत इंद्रियांचा पगडा मनावर न बसेल अशी खबरदारी ज्याप्रमाणें घ्यावी लागते, त्याचप्रमाणें संस्थेच्या बाबतीतही खबरदारी घ्यावयास पाहिजे. कारण विषयवासनांची जाचणूक व्यक्तीला तशीच समाजालाही होत असते. आपणांस कल्पना व ध्येय यांच्या चाललेल्या परस्पर युद्धामध्यें आपले आयुष्य कंठावें लागते, आपल्यास आपल्या ध्येयाला मूर्त स्वरूप द्यावयाचे असतें. परंतु यापुढें अधिक काळ न गमावतां पुढें सुख होईल या आशेनें सध्यां येणाऱ्या अडचणी सोसल्याविना वरील गोष्ट होणार नाहीं. लोकांच्या मृदु भाषणास बळी पडून आपल्या ध्येयापासून आपण कधीही पराङ्मुख होणार नाहीं अशी खबरदारी घेतल्याशिवाय वरील गोष्ट घडणें शक्य आहे काय? व्यक्ति व समाज यांमध्यें बिन लिहिलेला असा जो एक करार आहे, त्याची उभारणी देव-घेवीच्या साध्या तत्त्वावर केलेली आहे. म्हणून समाजाच्या सद्सद्विवेकबुद्धीवर जुलूम करून उपयोग नाहीं, किंवा आपलें ध्येय त्यांच्यावर बळेंच लादून त्या ध्येयास प्रतिकार करण्याचा हट्ट समाज धरून बसेल असें करतां कामा नये. समतोल मनानें व दृढ निश्चयानें आपण आपलें ध्येय साध्य करून घेण्याचा उद्योग करावा व मनामध्यें असा विश्वास बाळगावा कीं, आज जरी परिस्थिति आपल्या विरुद्ध आहे, तथापि कांहीं काळानें ती आपल्यास अनुकूल होईल, मात्र लोकांनीं केलेल्या स्तुतीकडे किंवा निंदेकडे लक्ष न देतां आपण आपला विश्वास दृढ ठेविला पाहिजे.

—तुम्हीं कोणतेंही मोठें कार्य किंवा उद्योगधंद्याची जबाबदारी शिरावर घ्या. त्यांत यशस्वी व्हायचें असल्यास तुमच्याठायीं आत्मविश्वास दांडगा असला पाहिजे, त्याशिवाय तुमच्या पदरांत यश पडणार नाहीं.

—कोणत्याही उद्योगांत तुम्हीं अपेशी कां होतां? कारण तुमचा तुमच्या कर्तबगारीवर विश्वास नसतो. मी अमूक गोष्ट पार पाडणारच अशा विश्वासानें तुम्हीं कामाला लागा. मग तुमच्याठायीं आपोआप सामर्थ्य निर्माण होईल. विश्वास, आत्मविश्वास हा बहुमोलाचा गुण आहे हें नेहमीं लक्षांत बाळगा.

# मल्याळी जनतेचा शारदोत्सव

केरळ देशांत आपल्या शारदीय नवरात्र महोत्सवाच्या काळांत केरळीय किंवा मल्याळी लोकांचा दहा अकरा दिवस थाटामाटानें साजरा होणारा जो सण त्याचें नांव ओमन् किंवा तिरुओणम्.

आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या हस्त नक्षत्राच्या शुभमुहूर्तावर या उत्सवाला सुरवात होते आणि तो सतत दहा दिवस मोठ्या उत्साहानें सर्वत्र साजरा होतो.

आपल्या दिवाळी सारखाच केरळीय लोकांचा हा अगदीं आवडता सण आहे. मल्याळी लोकांचा पहिला महिना चिंगम्. या महिन्यांत ओनम् सण येतो. या दहा दिवसांत केरळांत सर्वत्र अगदीं अफाट आनंदाचें वातावरण असतें. चिंगममध्यें केरळांत पावसाळा संपतो. शेतांतली पिकें तयार झालेली असतात, यामुळें सर्वत्र पसरलेल्या प्रसन्न वातावरणांत हा सण तेथें मजेदारपणानें साजरा केला जातो.

केरळांत बळीराजाला महाबली म्हणतात. त्याची कथा तेथें आपल्यासारखीच सर्वांना सुपरिचित आहे. महाबळीला गोपालकृष्णानें तिसऱ्या पावलानें पाताळांत लोटले, तेव्हां राजा आणि प्रजा यांनीं कृष्णाला केलेली विनंती मान्य केली, म्हणून ओनम्च्या दिवशीं त्यांचा लाडका राजा केरळीय लोकांना भेटावयास येतो असे केरळांतले लोक मानतात. म्हणून त्याच्या स्वागतासाठीं हा सण आहे.

### कार्यक्रम

ह्या दहा दिवसांत मल्याळी स्त्रिया फार पहाटे उठून आपल्या घराची अंगणें झाडून स्वच्छ केल्यावर सारवतात. नंतर अंगणांत नानाविध फुलांनीं अतिशय चित्त-वेधक रांगोळ्या काढतात. पुरुषवर्ग सूर्योदयापूर्वी उठून अभ्यंगस्नान करून नवीन कपडे घालून देवदर्शनाला जातात.

### कैकोट्टीकली

केरळीय स्त्रिया उत्तमोत्तम पोषाख करून नृत्यासाठीं वर्तुळाकार उभ्या राहातात. त्यांच्यातली मुख्य स्त्री मल्याळम् भाषेंत गाणी म्हणते. गायनवादनाच्या ठेक्यावर सर्व स्त्रिया नृत्य करतात.

### वल्लमकली

बोटींची शर्यत पाहाणें हा या सणांतला महत्वाचा भाग आहे. पंपानदीच्या प्रवाहांत ही सजविलेल्या व देवांच्या निरनिराळ्या लीला व क्रीडा यांच्या दृश्यांनीं सादर केलेला नौकाविहाराचा कार्यक्रम फारच आकर्षक असतो. या उत्सवानिमित्त केरळांतल्या शाळा, कचेऱ्यांना १० दिवस सुटी असते.

# कुंभकर्णाची प्रतिज्ञा शेवटीं फोल ठरली !

रावणाला पराजय पतकरून परतावें लागलें, हें पाहून देवांना वाटूं लागलें कीं ह्याच्या छळांतून आपली लवकरच सुटका होणार. या विचारानें त्यांचीं मनें आनंदलीं. लज्जित होत्साता रावण दुर्गांत परत आला. तो मोठ्या विवंचनेंत पडला होता. थोडा वेळ बसून विचार केल्यानंतर त्याच्या जिवांत जीव आला आणि आपला निद्रित बंधु कुंभकर्ण यास उठविण्याची त्यानें आज्ञा केली.

एका शापाच्या प्रभावामुळें कुंभकर्णाला महिने न महिने निद्रा लागत असे आणि या युद्धाला तोंड फुटण्यापूर्वी कांहीं दिवसच तो निद्राधीन झाला होता. काय वाटेल तें करून त्याला उठवा आणि युद्धासाठीं सज्ज करा, असा रावणाचा आदेश होता.

' माझ्या सर्व तपश्चर्या अखेर निष्फळ ठरल्या आहेत. ऋषिवाणी एकंदरींत खरी होणार असं दिसतं ! ' असा रावण स्वतःशीं विचार करीत होता. पण असें असलें तरी शेवटपर्यंत लढा देण्याचा त्याचा निर्धार होता. अंतिम विजय आपलाच आहे, असा आत्मविश्वास त्याला होता; म्हणूनच युद्धाच्या पुढील तयारीच्या दृष्टीनें तो आदेश देत होता.

" दुर्गाच्या चारी दिशांना पहारे बसवा. नऊ दिवसांपूर्वीच कुंभकर्ण गाढ झोंपी गेला आहे. त्याला तसंच झोंपूं दिलं तर कित्येक महिने त्याला जाग यायची नाहीं. काय वाटेल तें करा पण त्याला उठवा. त्यानें रणभूमीवर पाऊल टाकतांच वानरसैन्याची दाणादाण उडल्याशिवाय राहाणार नाहीं. कुंभकर्णाला सामोरं यायची कुणाची छाती आहे ? त्याला जाग आली रे आली, कीं मला भ्यायचं कांहीं कारण नाहीं "

रावणाच्या दरबारांतील उच्चपदस्थ अधिकारी व सेवक कुंभकर्णाच्या प्रासादांत आले. जाग आल्याबरोबर त्याला विलक्षण भूक लागते, हें त्यांना माहीत होतें; म्हणून पहिल्यांदाच त्यांनीं अन्नाचे डोंगर रचून ठेवले. मग नगारे आणि शंख यांचा एकच जयघोष सुरू झाला. कुंभकर्णाचें निद्रिस्त धूड गदगदां हालवितां हालवितां अनेक राक्षसांना श्वास लागला. त्यांच्या गोंगाटानें आकाश भरून गेलें. लंकेतील सारे पशुपक्षी अगदीं भयभीत होऊन गेले. पण कुंभकर्णाला याचा थांगपत्ताहि नव्हता. त्याला जाग यावी म्हणून इतर राक्षस आपल्या परीनें धडपडतच होते. त्याच्या अंगावर हत्ती घातले. प्रतोदांनीं त्याला फोडून काढला. पण कुंभकर्ण आपला सुस्तपणें घोरत पडला होता.

थोड्या वेळानें त्यानें एक डोळा थोडासा उघडला आणि एखादा डांस झटकून टाकावा तसें त्या सर्व राक्षसांना झटकून टाकून त्यानें एक भली मोठी जांभई दिली.

त्याच्या झोपेंत हा व्यत्यय आला नसता तर तो किती महिने तसाच पडून राहिला असता कुणास ठाऊक! आपल्याला अशी अकस्मात् जाग कशी आली याची कांहींहि विचारपूस करण्याच्या भानगडींत न पडतां त्यानें सरळ पुढ्यांतल्या अन्नाचा डोंगर उदरांत रिचवण्यास सुरुवात केली. मांसाचे गोळेच्या गोळे उचलून तो तोंडांत टाकीत होता. किती हंडे रक्त व मद्य तो प्यायला असेल याचा पत्ताच नाहीं! त्याची थोडफार क्षुधाशांत झाली आहे, असें पाहून कांहींजणांनीं धीर केला आणि दाराशीं येऊन ठेपलेल्या वस्तुस्थितीची त्याला कल्पना करून दिली.

रावणाचा एक मंत्रि यूपाक्ष म्हणाला, "महाराज, आपला युद्धांत पराजय झाला आहे नि आपले प्राण संकटांत आहेत. सीतेचं प्रकरण आपल्या लक्षांत असेलच. राम-लक्ष्मण प्रचंड सैन्यानिशीं लंकेवर चालून आले आहेत. आपल्या अजिंक्य सैन्याचा त्यांनीं पार निःपात करून टाकला आहे. वानरसेनेनें लंकेला वेढा घातला आहे. स्वतः रावणमहाराजांनाही पराभव पत्करून परतावं लागलं. ते जिवंत परत आले हे मोठं सुदैवच होय."

हें ऐकतांच कुंभकर्ण संतापानें थरथर कांपूं लागला. "आतां या क्षणालाच मी निघतो नि शत्रुसैन्याला भुईसपाट करून येतो. वानरसेनेचा संहार करून मी राम-लक्ष्मणांचं रक्त घटाघटां पिऊन टाकीन नि एवढं करून आल्यावरच मग रावणाला तोंड दाखवीन!"

कुंभकर्णाचें हें भाषण ऐकून राक्षसांना मनांत आनंद झाला, पण परस्परच युद्धावर न जातां, जाण्यापूर्वी रावणाला भेटून जाण्याविषयीं त्यांनीं त्याचें मन वळविलें.

तोंड धुवून कुंभकर्ण रावणाच्या भेटीला आला.

कुंभकर्णाला रावणाकडे जातांना पाहून राजपथावर उभ्या असलेल्या सैनिकांना धीर आला आणि त्यांनीं कुंभकर्णावर पुष्पवृष्टि केली. कुंभकर्ण रावणासमोर येऊन उभा राहिला. आपल्या महापराक्रमी भावाला आलेला पाहातांच रावण सिंहासनावरून खालीं उतरला आणि त्यानें त्याला कडकडून आलिंगन दिलें.

"बोल, काय आज्ञा आहे तुझी?" कुंभकर्णानें विचारलें, "माझी झोपमोड कशासाठीं करवलीस? एवढं काय मोठं संकट आलं आहे तुझ्यावर? कुणाला आपल्या जिवाचा एवढा उबग आला आहे? कोण प्रेतवत् होण्यासाठीं एवढा आतुर झाला आहे?"

रावण म्हणाला, "तूं झोंपलेला असल्यामुळें काय काय घडलें आहे याची

तुला कल्पना नाहीं. राम मला मोठं संकट होऊन बसला आहे. जो महासागर आपणांस अनुलंघनीय वाटत होता. त्या सागरावर सेतु बांधून तो . प्रचंड सैन्यानिशीं लंकेंत येऊन थडकला आहे. त्याच्याशीं संगर करायला गेलेल्या राक्षससेनेचा त्यानें निःपात करून टाकला आहे. आतां तूंच मनावर घेतलंस तर या आपत्तींतून आम्हां सर्वांची मुक्तता होणार आहे. तूं माझी एवढी अपेक्षा पुरी करशील अशी मला आशा आहे. देवांची तूं कशी दाणादाण उडवली होतीस, हें मला माहीत आहे. तुझं माझ्यावर जिवापलीकडे प्रेम आहे, युद्धांत तुझा हात धरणारा कुणीहि नाहीं. जा, सत्वर जा आणि वानरसेनेचा संपूर्ण संहार करून लंकेची मुक्तता कर ! ”

रावणाचें हें भाषण ऐकतांच कुंभकर्णाचें बाहु युद्धासाठीं फुरफुरूं लागले. पण दुसऱ्याच क्षणीं सगळ्या गोष्टींचें त्याला स्मरण झालें. आपल्या पराक्रमावर रावणाची श्रद्धा अतिशयोक्त आहे याची जाणीव त्याला असल्यामुळें तो कडवटपणानें हसला व म्हणाला, “ क्षमा कर, रावणा ! पण आम्ही सांगत होतो तेव्हां तूं दुर्लक्ष केलंस. आतां आमचीच भीति खरी ठरली आहे. आमचा उपदेश वेळींच मनावर घेतला असतास तर ! आतां भोगतो आहेस तीं तुझ्याच प्रमादांची नि पापकर्मांची फळं आहेत. सीतेचं अपहरण करून तूं तिला इथें घेऊन आलास. कामांध होऊन अविचारानें वागणाऱ्याच्या पदरांत सर्वनाशापेक्षां दुसरं काय पडणार आहे ? आपल्या सामर्थ्यावर तुझा एवढा विश्वास होता तर राम—लक्ष्मणांचा वध करूनच सीतेचं अपहरण तूं कां केलं नाहींस ? तूं अविचार केला आहेस तसाच वागण्यांतहि चुकला आहेस. सुज्ञ आणि निष्ठावंत नातेवाईकांचा स्नेह्यांचा सदुपदेश जो अव्हेरतो तो अखेर असाच विनाशाच्या मार्गानें जात असतो. या घटना अटळ आहेत हें तुला कळत नव्हतं, असं थोडंच आहे ? कुणाचा उपदेश घ्यायचा नि कुणाचा नाहीं,, हें राजपदावर असणाऱ्याला समजूं नये काय ? ”

हें प्रवचन रावणाला रुचण्यासारखें नव्हतेंच. त्याला आतां नीतिपाठ नको होते. राज्यशास्त्राची शिकवण घ्यावयाची नव्हती. खरें म्हणजे तो कुंभकर्णावर संतापला होता; पण आपला क्रोध बाहेर दिसूं न देतां तो म्हणाला, “ बंधो, झाल्या गेल्या गोष्टींचं हें चर्वितचर्वण आतां कशासाठीं ? मला या क्षणीं आवश्यकता आहे ती तुझ्या सामर्थ्याची, टीकेची नव्हे. झालं गेलं होऊन गेलं. तें न्यायी होतं कीं अन्यायी होतं, शहाणपणाचं होतं कीं मूर्खपणाचं होतं, याचा काथ्याकूट आतां करून काय साधणार आहे ? पुढें काय हा या क्षणींचा प्रश्न आहे. आपला पराक्रम गाजवून झालेली हानि भरून काढणं, हें तुझं कर्तव्य आहे. आपत्तीच्या काळीं जो सहाय्यासाठीं धावून येतो तोच खरा आप्त नि स्नेही. माझ्या वर्तणुकीवर निष्कारण कोरडे ओढीत

बसण्यापेक्षां तूं मला सहाय्याचा हात कां देत नाहींस ? माझ्यावर तुझं जिवापलीकडे प्रेम आहे ना ? आतां सर्वस्वीं मी तुझ्यावरच अवलंबून आहे."

एवढें ऐकल्यावर कुंभकर्णाचें हृदय भरून आलें नसतें तरच नवल ! तो आश्वासनपूर्वक रावणाला म्हणाला, " कितीहि झालं तरी मी तुझा भाऊ आहे. राम-लक्ष्मणांचा वध केल्याशिवाय मी परतणार नाहीं याबद्दल आतां निःशंक राहा. पाहा आतां कशी या वानरसेनेची धूळधाण उडवून देतों तें ! रामाचं शिर तुझ्या पायांशीं आणून ठेवीन तर खरा मी नांवाचा कुंभकर्ण. दुर्गाच्या तटबंदीवर उभें राहून सुग्रीवाला रक्ताच्या थारोळ्यांत गतप्राण होऊन पडलेला तूं पाहाशील. तुझ्यावर चाल करून यायला रामाला आतां माझ्याच प्रेतावरून यावं लागेल. पण माझा वध करण्याचं सामर्थ्य कुणांतच नसल्यामुळें त्याला हेंहि शक्य होणार नाहीं."



—जीं माणसें समर्थ असतात, त्यांचा स्वसामर्थ्यावर असीम विश्वास असतो. श्रद्धा हेंच सामर्थ्य.

—या जगांत नानाप्रकारचे मोह आपल्या आध्यात्मिक प्रगतीआड येत असतात. त्याच्यापासून सुटका करून घेण्यासाठींच देवाची प्रार्थना करायची असते. त्याची करुणा भाकायची असते. त्याची कृपा हेंच आपलें कवच. तें मिळविण्यासाठीं झटायचें आहे.

—प्रयत्न करा आणि श्रद्धावंत व्हा. आयुष्यांत या दोन गोष्टींचें महत्त्व अपरंपार आहे. तुम्ही प्रयत्न करून पाहिल्याशिवाय कांहीं साध्य होणार नाहीं. आणि ईश्वरावर श्रद्धा ठेवल्याशिवाय तुम्ही यश मिळवूं शकणार नाहीं.

—मनुष्यजातीवर नानाप्रकारचीं संकटें येतात व त्यांच्यास नानाप्रकारचे रोगही येतात. त्या सर्वांवर जर कोणता एकमेव उपाय असेल तर तो म्हणजे सतत उद्योगांत रहाणें.

—माणसाला शिक्षण पाहिजे; परंतु तें कशासाठीं ? वकील, डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक किंवा सैनिक बनतां यावे यासाठीं का ? नाहीं. माणसांत मनुष्यत्व यावें, त्याच्यांत माणुसकी यावी, यासाठीं शिक्षणाची जरूरी आहे.